शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार व अन्य क्रीडा
पुरस्कार सुधारित नियमावली, २०२३

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक:शिछपु-२०२३/प्र.क्र.१८८/क्रीयुसे-२**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- २९ डिसेंबर, २०२३.

**वाचा :-** १. शासन निर्णय क्रमांक : शिछपु २०२२/प्र.क्र.९३/क्रीयुसे २ दिनांक १४.१२.२०२२.

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र राज्यातील नामवंत सर्वोत्कृष्ट क्रीडापटूंना शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार देण्याची योजना सन १९६९-७० पासून आणि राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर देशाचे नाव उज्ज्वल करणारे खेळाडू घडविण्याऱ्या क्रीडा मार्गदर्शकांना उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार देण्याची योजना सन १९८८-८९ पासून शासनाने अंमलात आणली आहे. तसेच ज्येष्ठ क्रीडापटू, क्रीडा मार्गदर्शक, संघटक-कार्यकर्ते व क्रीडा क्षेत्राशी संबंधित अशा ज्या व्यक्तीनी क्रीडा क्षेत्रासाठी आपले सर्वस्व पणाला लावून आपले जीवन क्रीडा विकासासाठी व्यतीत केले आहे, अश्या जेष्ठ क्रीडा महर्षींचा गौरव करण्यासाठी सन २००१-०२ पासून महाराष्ट्र शासनाने शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्कार देण्याची योजना अंमलात आणली आहे.

२. शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्कार, शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार ( उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक/जिजामाता), शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू), शिवछत्रपती राज्य क्रीडा पुर (दिव्यांग खेळाडू), शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (साहसी उपक्रम) या पुरस्कारांची नियमावलीत सुधारणा करण्यासाठी दि. ०१.०८.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये श्री. धनराज पिल्ले, पद्मश्री पुरस्कारार्थी यांच्या अध्यक्षतेखाली अन्य १५ सदस्यांची  समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने शासनास सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने दि. २४.०१.२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार व अन्य क्रीडा पुरस्कार नियमावलीत सुधारणा करण्यात आलेली आहे. सन २०१८-१९ या वर्षातील शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारासाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांची प्राथमिक पडताळणी करताना संचालनालयाकडे प्राप्त झालेली निवेदने विचारात घेता, सदर पुरस्कार नियमावलीतील काही बाबी अधिक स्पष्ट करणे आवश्यक आहे, असे दिसून आले. त्यानुषंगाने सदर नियमावलीमध्ये सुधारणेबाबत प्रस्ताव सादर करण्याचे आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांना सूचित करण्यात आलेले होते. त्यानुसार पुरस्कार नियमावलीत सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यातील खेळाडू, संघटक/कार्यकर्ते, मार्गदर्शक यांना शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्कार, उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार, शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू, संघटक/कार्यकर्ते), एकलव्य राज्य क्रीडा पुरस्कार (दिव्यांग), साहसी क्रीडा पुरस्कार व जिजामाताक्रीडा पुरस्कार देऊन यांचा गौरव करण्यात येतो. पुरस्कारबाबत यापुर्वीचे सर्व व दि.१४.१२.२०२२ रोजीचा शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत आहे. या शासन निर्णयाव्दारे सोबत जोडलेल्या नियमावलीस मान्यता देण्यात  येत आहे.

(१) **सर्वसाधारण नियमावली**

सोबत जोडलेल्या नियमावलीतील नियम क्र.१ अन्वये शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांची सर्वसाधारण नियमावली निश्चित करण्यात आलेली आहे.

**(२) शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार ( जीवन गौरव )**

जेष्ठ क्रीडापटू, क्रीडा मार्गदर्शक, क्रीडा संघटक/कार्यकर्ते व क्रीडा क्षेत्राशी संबंधित अशा ज्या व्यक्तीनी क्रीडा व खेळासाठी आपले सर्वस्व पणाला लावून आपले जीवन क्रीडा विकासासाठी व्यतीत केले आहे, अशा क्रीडा महर्षीचा गौरव करण्याच्या दृष्टीने सोबत दर्शविलेल्या नियमावलीतील नियम क्र.२ अन्वये शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्काराचे नियम निश्चित करण्यात येत आहेत.

**(३) शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार ( उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक/जिजामाता):-**

क्रीडा क्षेत्रातील ज्या क्रीडा मार्गदर्शकांनी केलेल्या मार्गदर्शनामुळे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळाडू सहभागी होण्यास व घडविण्यास मदत झाली असेल, त्याचप्रमाणे ज्यांच्या मार्गदर्शनामुळे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळाडू निर्माण झाले असतील अशा क्रीडा मार्गदर्शकांचा गौरव करण्याच्या दृष्टीने सोबत दर्शविलेल्या नियमावलीतील **नियम क्र.३ अन्वये** उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक/जिजामाता पुरस्काराचे नियम निश्चित करण्यात येत आहेत.

**(४) शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू):-**

क्रीडा क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महाराष्ट्रातील खेळाडूंचा गौरव करण्याच्या दृष्टीने सोबत दर्शविलेल्या नियमावलीतील नियम क्र. ४ अन्वये शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू) चे नियम निश्चित करण्यात येत आहेत.

**(५) शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (साहसी उपक्रम):-** साहसी क्रीडा प्रकारांमध्ये विशेष उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या राज्यातील खेळाडूंचा गौरव करण्याच्या दृष्टीने सोबत दर्शविलेल्या नियमावलीतील नियम क्र. ५ अन्वये शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (साहसी उपक्रम) चे नियम निश्चित करण्यात येत आहेत.

**(६) शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (दिव्यांग खेळाडू):-**

क्रीडा क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महाराष्ट्रातील (दिव्यांग) खेळाडूंचा गौरव करण्याच्या दृष्टीने सोबत दर्शविलेल्या नियमावलीतील नियम क्र. ६ अन्वये शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (दिव्यांग खेळाडू) चे नियम निश्चित करण्यात येत आहेत.

उपरोक्त पुरस्कार वितरणाच्या आयोजन संदर्भात खर्चाचा तपशील आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांनी पुरस्कार वितरण समारंभाच्या आधी शासनास सादर करुन मंजूर करुन घ्यावा.

उपरोक्त प्रयोजनासाठी होणारा खर्च मुख्य लेखाशिर्ष २२०४- क्रीडा व युवक सेवा -१०४ क्रीडा व खेळ - (०३) (०१)राज्य क्रीडा पुरस्कार कार्यक्रमाचे आयोजन ५० - इतर खर्च योजनेतर योजना, संगणक क्रमांक (२२०४-१५६९) या लेखाशिर्षाखाली त्या त्या आर्थिक वर्षात केलेल्या मंजूर तरतुदीमधून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३१२२९१९२२२५१७२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

DNYANESHWAR ASARAJI AVHAD

Digitally signed by DNYANESHWAR ASARAJI AVHAD
DN: CN = DNYANESHWAR ASARAJI AVHAD, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT
Date: 2024.01.01 12:44:17 +05'30'

**( ज्ञानेश्वर आव्हाड )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत ,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. मंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई.
५) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा / विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
६) मा. विधानसभा / विधानपरिषद सदस्य
७) प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
८) प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
९) अपर मुख्य सचिव, क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
११) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
१२) महालेखापाल (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
१३) सर्व एकविध राज्य संघटना व महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन (संचालनालयामार्फत)
१४) सर्व उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा (संचालनालयामार्फत)
१५) सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी (संचालनालयामार्फत)
१६) ग्रंथपाल, विधीमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई.
१७) कक्ष अधिकारी, (क्रीयुसे - १, क्रीयुसे -२)
१८) निवडनस्ती, क्रीयुसे-२.

| नियम क्र.१ | शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार सर्वसाधारण नियमावली |
|---|---|
| १.१ | या नियमांना "**शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार सर्वसाधारण नियमावली, २०२३**" असे संबोधण्यात यावे. |
| १.२ | **पुरस्काराचे स्वरुप**-<br>शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारामध्ये खालील बाबींचा समावेश राहील.<br>(अ) गौरवपत्र<br>(ब) स्मृतिचिन्ह<br>(क) जीवन गौरव पुरस्कारासाठी रोख रु. ५,००,०००/- (रु.पाच लाख फक्त)<br>इतर सर्व पुरस्कारासाठी प्रत्येकी रोख रु. ३,००,०००/- (रु. तीन लाख फक्त)<br>(ड) क्रीडा पुरस्कार जाहीर होणे व जाहीर झालेल्या पुरस्काराचे वितरण यामधील कालावधी बरेचदा अत्यल्प असल्याने क्रीडा विभागा मार्फत ब्लेझरचे कापड खरेदी करून व क्रेस्ट (क्रेस्ट वरील मजकूर मराठीत असावा) उपलब्ध करुन देऊन ब्लेझर शिलाईसाठी रोख रक्कम/NIFT/RTGS द्वारे रु. ३,०००/-पुरस्कारार्थ्यांस अदा करण्यात यावी. |
| १.३ | **अर्ज करण्याची पध्दत** :<br>अर्जदाराने आपल्या कामगिरीच्या तपशिलासह फक्त ऑनलाईन पध्दतीने अर्ज क्रीडा विभागाने उपलब्ध करून दिलेल्या लिंकवर उपलब्ध करुन देण्यात यावा. अशा पद्धतीने अर्ज सादर करतांना ज्या ठिकाणी संबंधित क्रीडा संघटनेची शिफारस आवश्यक आहे, त्या ठिकाणी सदर शिफारस प्राप्त करून घेऊन संबंधित अर्जदाराने अर्जासह अपलोड करावी. सदर प्रक्रीयेमध्ये ऑनलाईन अर्ज करताना कोणत्याही खेळाडूस अडचण आल्यास संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी अर्जातील माहिती भरण्यास मदत करावी. |
| १.४ | अपूर्ण अर्जाचा पुरस्काराकरीता विचार केला जाणार नाही. |
| १.५ | अर्ज केलेल्या व्यक्तीची पुरस्कारासाठी निवड झालीच पाहिजे असा हक्क अर्जदारास सांगता येणार नाही. |
| १.६ | फक्त ऑनलाईन अपलोड केलेली कागदपत्रे पुरस्कारासाठी विचारात घेतली जातील. त्याव्यतिरिक्त ऑफ लाईन पद्धतीने सादर केलेली कागदपत्रे विचारात घेतली जाणार नाहीत. |
| १.७ | शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार त्या-त्या क्षेत्रात सर्वोच्च कामगिरीकरीता वितरीत केला जात असल्याने सदर पुरस्कार विभागून दिला जाणार नाही. |
| १.८ | एखादया वर्षी पुरस्कारासाठी पात्र अशी व्यक्ती आढळून न आल्यास पुरस्कार घोषित केला जाणार नाही. |
| १.९ | एखाद्या वर्षी हा पुरस्कार देण्यात न आल्यास पुढील वर्षासाठी जादाचा पुरस्कार म्हणून तो गणण्यात येणार नाही. |
| १.१० | सदर पुरस्कार मरणोत्तर जाहीर करण्यात येऊ नये. |
| १.११ | पुरस्कारासाठी कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास सदर व्यक्तीस अपात्र समजण्यात येईल. |
| १.१२ | पुरस्कार रद्द करण्याचे अधिकार शासनास राहतील आणि तसे घडल्यास पुरस्कार मिळालेली व्यक्ती सदर पुरस्कार आयुक्तांना परत करेल. |
| १.१३ | पुरस्कार अर्जामध्ये अथवा कागदपत्रांमध्ये सादर केलेली माहिती खोटी असल्याचे सिध्द झाल्यास, अशा व्यक्तींना देण्यात आलेला पुरस्कार परत घेण्यात येईल व त्यांचे विरुध्द फौजदारी कारवाई करण्यात यावी. |

| | |
|---|---|
| १.१४ | राज्य निवड समितीने शासनास पुरस्कारार्थींची अंतिम शिफारस केल्या नंतर संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी संबंधित प्रस्तावित असलेल्या पुरस्कारार्थींचा चारित्र्य पडताळणी अहवाल पोलीस विभागाकडून प्राप्त करुन घेऊन क्रीडा व युवक सेवा संचालनालयास सादर करावा. सदरचा चारीत्र्य प्रमाणपत्र अहवाल प्रतिकुल असल्यास सदर पुरस्कारार्थीस अपात्र ठरविण्यात येईल. |
| १.१५ | सदर पुरस्कारासाठी शिफारस करतांना अर्जदारांची क्रीडा कामगिरी दि. १ जुलै ते ३० जून असे वर्षग्राह्य धरुन विचारात घेण्यात येईल.<br>(साहसी क्रीडा प्रकारासाठी स्वतंत्र कालावधी निश्चीत केलेला आहे.) |
| १.१६ | शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार व अन्य पुरस्काराबाबतचे सर्व अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार शासनास राहतील. |
| १.१७ | **अर्जाची छाननी** :<br>पुरस्कार निवड समितीचे कामकाज सुलभरीत्या पार पाडण्याच्या दृष्टीने आयुक्त, क्रीडा यांनी त्यांच्या स्तरावर पुरस्कार निहाय उपसमित्या गठीत कराव्यात. |
| १.१८ | अर्जदाराने ऑनलाईन अर्जाची प्रत क्रीडा संचालनालयास सादर केल्यानंतर सदर अर्जांची प्राथमिक छाननी व गुणांकन क्रीडा संचालनालयाचे स्तरावर करण्यात येईल. |
| १.१९ | प्राथमिक छाननी झाल्यानंतर संबंधित खेळाच्या राज्य संघटनांचे प्रतिनिधी अर्जांची व गुणांकनाची फेरतपासणी करतील. |
| १.२० | आयुक्त, क्रीडा व युवक सेवा सर्व अर्जांची छाननी केलेले व प्रस्तावित केलेले गुणांकनासह, पात्र, अपात्रसह संकेतस्थळावर प्रसिध्द करुन सूचना व हरकती ७ दिवसात मागवतील. तद्नंतर सूचना व हरकतींवर निर्णय घेऊन अंतिम शिफारशीसाठी राज्य पुरस्कार निवड समिती समोर ठेवतील. |
| १.२१ | उपरोक्त पुरस्कार प्रक्रीयेचे वेळापत्रकामध्ये बदल करण्याचे अधिकार आयुक्त, क्रीडा यांना राहतील. |
| १.२२ | **पुरस्कार निवडीचे वेळापत्रक** :-<br>दरवर्षी दि. २५ ऑक्टोबर पूर्वी वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांनी क्रीडा संघटक, मार्गदर्शक व खेळाडू यांच्या कडून दि. २५ नोव्हेंबर पर्यंत अर्ज मागविण्यात यावेत. दरम्यानच्या कालावधीत सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी जिल्ह्यातील सर्व संघटना यांची सभा घेऊन पुरस्काराबाबत सर्व स्थानिक वृत्तपत्रामध्ये बातमी द्यावी. अर्जदाराने क्रीडा विभागाचे वेबसाईटवर उपलब्ध करुन दिलेल्या लिंक (Link) वर अर्ज सादर करावा. उपरोक्त वेळापत्रकामध्ये बदल करण्याचे अधिकार आयुक्त, क्रीडा युवक सेवा यांना राहतील. |
| १.२३ | आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांचे स्तरावर प्राथमिक छाननी समिती गठीत करुन सर्व अर्जांचे मुल्यांकन/गुणांकन करण्यात येईल. |
| १.२४ | राज्यस्तरीय पुरस्कार निवड समितीच्या बैठकीत शासनास शिफारस करावयाच्या संभाव्य पुरस्कारार्थींच्या नावांची अंतिम यादी तयार करण्यात येईल. |
| १.२५ | छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्ताने पूर्वनियोजीत ठिकाणी व वेळी “पुरस्कार वितरण समारंभ” आयोजित करण्यात यावा. |
| १.२६ | पुरस्कार प्रक्रीयेच्या सर्व वेळापत्रकामध्ये परिस्थितीनुरुप बदल करण्याचे अधिकार आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांना राहतील. |
| १.२७ | **पुरस्कार निवड समिती :**<br>राज्यस्तरीय पुरस्कार निवड समिती पुढीलप्रमाणे गठीत करण्यात यावी – |

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | मा. मंत्री, क्रीडा व युवक कल्याण | अध्यक्ष |
| २. | मा. राज्यमंत्री, क्रीडा व युवक कल्याण | उपाध्यक्ष |
| ३. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | सदस्य |
| ४. | महाराष्ट्रातील क्रीडा क्षेत्रातील पद्मविभूषण, पद्मभूषण, पद्मश्री तसेच राजीव गांधी खेलरत्न, द्रोणाचार्य व अर्जुन पुरस्कारार्थी यामधून पाच सदस्य | अशासकीय सदस्य (तज्ज्ञ) |
| ५. | महाराष्ट्र ऑलिम्पिक व पॅरा ऑलिम्पिक असोसिएशन यांचा प्रत्येकी एक प्रतिनिधी | अशासकीय सदस्य |
| ६. | आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य सचिव |

# शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्कार नियमावली २०२३

| नियम क्रमांक. २ | शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्कार |
|---|---|
| २.१ | या नियमांना **"शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्कार नियम, २०२३"** असे संबोधण्यात यावे. |
| २.२ | ज्येष्ठ क्रीडापटू किंवा क्रीडा मार्गदर्शक किंवा क्रीडासंघटक/कार्यकर्तेव क्रीडा क्षेत्राशी संबंधित अशा ज्या व्यक्तींनी क्रीडा व खेळांसाठी आपले सर्वस्व अर्पण करुन महाराष्ट्राच्या क्रीडा जीवनात अतुलनीय असे स्थान संपादन केले आहे व त्यांच्या व्यक्तीमत्वाचा, क्रीडा कार्य कर्तृत्वाचा आणि एकूणच त्यांच्या कामाचा महाराष्ट्राच्या क्रीडा जीवनावर संस्मरणीय असा प्रभाव पडला आहे, अशा क्रीडा महर्षिंचा गौरव करणे हे या पुरस्काराचे उद्दिष्ट आहे. |
| २.३ | दरवर्षी केवळ **महाराष्ट्रामधील एका व्यक्तीस** सदर पुरस्कार देण्यात येईल. |
| २.४ | महाराष्ट्रातील वय वर्षे ६० किंवा त्यापेक्षा अधिक वयाचे क्रीडापटू किंवा क्रीडामार्गदर्शक किंवा कार्यकर्ते/संघटक व क्रीडाक्षेत्रात काम करणाऱ्या इतर व्यक्ती, ज्यांनी आपल्या अतुलनीय कामगिरीने महाराष्ट्राच्या क्रीडा संस्कृतीची जोपासना केली आहे, त्यामध्ये लक्षणीय भर टाकली आहे आणि क्रीडा क्षेत्रात महाराष्ट्राचे नाव देशात व आंतरराष्ट्रीय पातळीवर उंचविण्यात संस्मरणीय अशी कामगिरी केली आहे किंवा क्रीडा क्षेत्रात मुलभूत स्वरुपाचे विशेष कार्य केले आहे, अशा व्यक्ती या पुरस्कारास पात्र राहतील. |
| २.५ | जीवन गौरव पुरस्कारासाठी महाराष्ट्रातील वय वर्षे ६० किंवा त्यापेक्षा अधिक वयाचे क्रीडापटू किंवा क्रीडामार्गदर्शक किंवा कार्यकर्ते/संघटक व क्रीडा क्षेत्रात काम करणाऱ्या इतर व्यक्ती, ज्यांनी आपल्या अतुलनीय कामगिरीने महाराष्ट्राच्या क्रीडा संस्कृतीची जोपासना केली आहे अशा व्यक्तींच्या नावांची शिफारस करण्यासाठी प्रतिवर्षी नामनिर्देश करणेसाठी क्रीडा क्षेत्रातील बहुमुल्य योगदान दिलेल्या खेळाडू व्यक्तींकडून (केंद्र शासनाचे महाराष्ट्रामधील पुरस्कारार्थी - मेजर ध्यानचंद खेल रत्न पुरस्कार, क्रीडा क्षेत्रातील योगदानाबाबत पद्मश्री पुरस्कारार्थी व यापुर्वीचे शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्कारार्थी) अशा व्यक्तींकडून जीवन गौरव पुरस्कारासाठी नामांकने मागविण्यात यावीत. उपरोक्त केंद्र शासनाचे पुरस्कारार्थी नामनिर्देश स्वरुपात त्यांच्या नावांची शिफारस संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी, उपसंचालक किंवा संचालनालयास लेखी स्वरुपात करण्यात यावी. |
| २.६ | नामांकन शिफारस करण्यासाठी उपरोक्त केंद्र शासनाच्या महाराष्ट्रामधील पुरस्कारार्थीकडून प्रत्येकी २ नामांकने मागविण्यात यावीत. सदर केंद्र शासनाच्या पुरस्कारार्थींकडून नामांकने मागविणेसाठी केंद्र शासनाच्या पुरस्कारार्थींची नावे निश्चीत करण्याचा अधिकार आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना राहील. |
| २.७ | क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणा-या व्यक्तींची माहिती प्रतिवर्षी विभागीय उपसंचालक व जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी परिशिष्ट -२.१ नुसार विहीत नमुन्यात क्रीडा व युवक सेवा संचालनयास सादर करणे आवश्यक राहील. तसेच यथायोग्य व्यक्तीबाबत माहिती संचालनालय स्तरावर संकलित करून समितीस शिफारस करण्यात यावी. |

## परिशिष्ट - २.१

## शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्कार क्रीडा कार्याचा तपशील

| | |
|---|---|
| नाव | |
| जन्म तारीख | |
| शिक्षण व व्यवसाय | |
| पत्ता | |
| संपर्क क्रमांक व ई-मेल | |

| | |
|---|---|
| खेळाडू म्हणून केलेली क्रीडा कामगीरीचा तपशील | आंतरराष्ट्रीय -<br>राष्ट्रीय - |
| एकविध क्रीडा संघटना व क्रीडा संस्था यांचे कार्यकारीनी व पदाधीकारी म्हणून केलेले कार्य | एकविध क्रीडा संस्था - अ - राष्ट्रीय स्तर<br>ब - राज्य स्तर<br>क -जिल्हा स्तर -<br>क्रीडा संस्था व क्रीडा मंडळे पदाधिकारी म्हणून केलेले कार्य - |
| क्रीडा प्रशिक्षक म्हणून केलेली कामगीरी | आंतरराष्ट्रीय खेळाडू-<br>राष्ट्रीय खेळाडू - |
| राज्य/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धांच्या निवड समितीचे सदस्य/ पंच/ सरपंच/ सामनाधिकारी/ वेळाधिकारी/ गुणलेखक /व्यवस्थापक/ तांत्रीक अधिकारी म्हणून केलेली कामगिरी | |
| गौरव व पुरस्कार- | |
| महाराष्ट्राचे नांव देशात व आंतरराष्ट्रीय पातळीवर उंचविण्यात संस्मरणीय अशी कामगीरी किंवा क्रीडा क्षेत्रात मुलभुत स्वरूपाचे विशेष कार्य. | |
| क्रीडा प्रचार व प्रसार | चर्चा सत्र- राज्य व राष्ट्रीय स्तर -<br>प्रात्यक्षिके -<br>पुस्तक प्रकाशन -<br>क्रीडा लेखन -<br>भाषणे आकाशवाणी - दुरदर्शन इतर वाहिन्या मुलाखत इ. |
| महाराष्ट्राचे नांव देशात व आंतरराष्ट्रीय पातळीवर उंचविण्यात संस्मरणीय अशी | १५० शव्दात नमूद करावे. |

| | |
|---|---|
| कामगीरी किंवा क्रीडा क्षेत्रात मुलभुत स्वरूपाचे विकासात्मक केलेले विशेष कार्य. | |
| इतर | |

उपरोक्त नमूद केलेली माहिती सत्य व बरोबर आहे.

स्थळ -

दिनांक-

विभाग़ीय उपसंचालक/ जिल्हा क्रीडा अधिकारी नाव व

स्वाक्षरी

शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार ( उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक/जिजामाता) नियमावली २०२३.

| नियम क्र.३ | शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक)<br>जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार (उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक - महिला) |
|---|---|
| ३.१ | या नियमांना "शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक), जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार (उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक - महिला) नियम, २०२३" असे संबोधण्यात यावे. |
| ३.२ | उच्च दर्जाचे खेळाडू घडवून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर सहभागी होण्यास उद्युक्त केले असेल आणि राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील राज्याचा लौकिक वाढवि ण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या पुरूष व महिला क्रीडा मार्गदर्शक यांचा सन्मान करणे हा या पुरस्कारामागील उद्देश आहे. |
| ३.३ | एका पुरस्कार वर्षामध्ये जास्तीत जास्त चार पुरस्कार देण्यात येतील. |
| ३.४ | उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शकांमधून त्या गटामध्ये गुणानुक्रमे सर्वोच्च गुण संपादित करणाऱ्या महिला क्रीडा मार्गदर्शकास देण्यात येणारा पुरस्कार हा जिजामाता पुरस्कार म्हणून गणण्यात येईल. |
| ३.५ | दिव्यांग खेळाडू घडविणा-या मार्गदर्शकास प्रतिवर्षी एक पुरस्कार देण्यात येईल. |
| ३.६ | ॲथलेटिक्स, जिम्नॅस्टिक, मल्लखांब, जलतरण/डायव्हिंग व नेमबाजी या क्रीडा प्रकारासाठी एक पुरस्कार. (क्रीडा मार्गदर्शकाने वरीष्ठ राष्ट्रीय स्पर्धेत प्राविण्य संपादित करणारे किंवा अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केलेले असे दोन्ही मिळून किमान १२ खेळाडू घडविलेले असणे आवश्यक आहे.) |
| ३.७ | कुस्ती, ज्युदो, तलवारबाजी, तायक्वांदो, धनुर्विद्या, लॉन टेनिस, टेबलटेनिस, ट्रायथलॉन, बुध्दीबळ, बॅडमिंटन, वुशू, मुष्टीयुध्द, वेटलिफ्टिंग,सायकलींग, स्केटिंग, स्क्वॅश, मॉडर्न पेंटॅथलॉन, स्पोर्ट क्लाइंबिंग, योगासने या वैयक्तिक खेळाकरीता एक पुरस्कार. (क्रीडा मार्गदर्शकाने वरीष्ठ राष्ट्रीय स्पर्धेत प्राविण्य संपादित करणारे किंवा अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केलेले असे दोन्ही मिळून किमान १२ खेळाडू घडविलेले असणे आवश्यक आहे.) |
| ३.८ | आट्यापाट्या, कबड्डी, कॅनॉईंग, क्रिकेट, खो-खो, फुटबॉल, बास्केटबॉल, रोईंग, हॉकी, हॅन्डबॉल, व्हॉलीबॉल, वॉटरपोलो, रग्बी, बेसबॉल, सॉफ्टबॉल या सांघिक खेळाकरीता एक पुरस्कार देण्यात यावा. (क्रीडा मार्गदर्शकाने वरीष्ठ राष्ट्रीय स्पर्धेत प्राविण्य संपादित करणारे किंवा अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केलेले असे दोन्ही मिळून किमान १५ खेळाडू घडविलेले असणे आवश्यक आहे.) बेसबॉल व सॉफ्टबॉल या क्रीडा प्रकारांचा समावेश ऑलिंपिक, आशियाई क्रीडा स्पर्धा व राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत असून या क्रीडा प्रकारांमध्ये बेसबॉल हा पुरूषांकरीता तर सॉफ्टबॉल हा क्रीडा प्रकार महिलांकरीता आयोजित होत असल्याने तद्नुषंगाने खेळाडूंची कामगिरी मार्गदर्शकाच्या कामगिरीसाठी ग्राह्य धरण्यात येईल. |
| ३.९ | दिव्यांग खेळाडू घडविणाऱ्या मार्गदर्शकाने वरीष्ठ पॅरा राष्ट्रीय स्पर्धा किंवा त्यावरील स्पर्धांमध्ये किमान ०८ प्राविण्यप्राप्त खेळाडू घडविलेले असणे आवश्यक आहे. (पॅराऑलिंपिक, पॅरा एशियन व पॅरा कॉमनवेल्थ या स्पर्धांमध्ये ग्राह्य असणारे खेळप्रकार व त्याच्या बाबी पुरस्काराकरीता ग्राह्य मानण्यात येतील. त्याचप्रमाणे मुक-बधीर खेळाडू व गतिमंद / मतिमंद खेळाडूंच्या बाबतीत स्पेशल ऑलिंपिक व डिफलिंपिक या क्रीडा स्पर्धेतील खेळप्रकार व त्यांच्या बाबी पुरस्काराकरीता ग्राह्य मानण्यात येतील) सर्व क्रीडा प्रकारामधील |

| | |
|---|---|
| | खेळनिहाय गुणांकनाद्वारे सर्वाधिक गुण संपादित करणाऱ्या एकाच क्रीडा मार्गदर्शकास पुरस्काराकरीता पात्र ठरविण्यात येईल. |
| ३.१० | पुरस्कार वर्षातील ३० जून रोजी संपणाऱ्या वर्षासह लगतपूर्व १५ वर्षामध्ये क्रीडा मार्गदर्शकाने घडविलेल्या खेळाडूंची कामगिरी गुणांकनाकरीता परिगणित केली जाईल. उदाहरणार्थ, जर पुरस्कार हा सन २०२२-२३ या वर्षाकरीता असेल तर संबंधित क्रीडा मार्गदर्शकांची दि. ३० जून २०२३ पासून मागील पंधरा वर्षातील कामगिरी पुरस्काराकरीता ग्राह्य धरण्यात येईल. |
| ३.११ | पुरस्कारासाठी अर्ज करणाऱ्या क्रीडा मार्गदर्शकाचे महाराष्ट्रातील वास्तव्य जन्मापासूनचे किंवा सलग पंधरा वर्षाचे असणे आवश्यक राहील. अशा क्रीडा मार्गदर्शकाने घडविलेला खेळाडू महाराष्ट्रातील रहिवासी असला पाहिजे व त्याने महाराष्ट्र राज्याचे वरिष्ठ राष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधीत्व केले असले पाहिजे. |
| ३.१२ | राज्यातील क्रीडा मार्गदर्शकाने घडविलेल्या राज्याबाहेरच्या खेळाडूची आंतरराष्ट्रीय दर्जाची कामगिरी फक्त गुणांकनाकरीता लक्षात घेता येईल. तथापी संबंधीत क्रीडा मार्गदर्शकाने पुरस्कारासाठी निश्चीत केलेल्या किमान संख्येनुसार प्राविण्य प्राप्त खेळाडू घडविलेले असणे आवश्यक आहे. |
| ३.१३ | अर्जदार क्रीडा मार्गदर्शकाच्या कामगिरीचे मुल्यांकन तो संबंधित खेळाडूचा मुळ क्रीडा मार्गदर्शक असल्यासच करावे. तसेच संबंधित खेळाडूस त्या क्रीडा मार्गदर्शकाने किमान ३ वर्षे सलग मार्गदर्शन केलेले असणे आवश्यक आहे. जर एखाद्या खेळाडूने आपला क्रीडा मार्गदर्शक म्हणून आपला एखादा नातेवाईक हा क्रीडा मार्गदर्शक म्हणून नमूद केलेला असेल तर अशा क्रीडा मार्गदर्शकाने सुध्दा वरीष्ठ राष्ट्रीय स्पर्धा किंवा त्यावरील स्पर्धांमध्ये किमान ८ खेळाडू दिव्यांगसाठी, १० खेळाडू वैयक्तिक खेळ व सांघिक खेळासाठी १० खेळाडू घडविलेले असणे आवश्यक आहे. तसेच याबाबतची अधिक चौकशी करण्याचे अधिकार शासनास राहतील. त्यामध्ये जर गैर प्रकार अथवा खोटी माहिती दिलेली असल्याचे आढळून आल्यास असे हमीपत्र देणाऱ्या खेळाडूला व अर्ज करणा-या संबंधित क्रीडा मार्गदर्शकाला काळ्या यादीत टाकण्यात येईल. असे अर्जदार पुन:श्च पुरस्कारासाठी अर्ज करण्यास अपात्र राहतील. तसेच संबंधित खेळाडू व क्रीडा मार्गदर्शकावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. |
| ३.१४ | क्रीडा मार्गदर्शक म्हणजे खेळाडूला त्याच्या क्रीडा कारकिर्दीत प्राथमिक प्रशिक्षण, मूलभूत प्रशिक्षण व प्रगत प्रशिक्षण देणारा प्रशिक्षक होय . |
| ३.१५ | क्रीडा मार्गदर्शक हा सर्टीफिकेट कोर्स, डिप्लोमा कोर्स, एनआयएस कोर्स, संघटनेव्दारा आयोजित क्रीडा मार्गदर्शक अ, ब, क, ड स्तर, राज्य/राष्ट्रीय /आंतरराष्ट्रीय खेळाडू, कॅम्पमध्ये किंवा स्पर्धेमध्ये प्रशिक्षक म्हणून नियुक्त या पैकी किमान एक पात्रता ग्रहण करणे आवश्यक आहे. मूळ क्रीडा मार्गदर्शक यांनी प्राथमिक/प्रगत काळातील किमान ३ वर्ष सातत्यपूर्ण प्रशिक्षण देणे आवश्यक राहील. |
| ३.१६ | खेळाडूनी हमीपत्रामध्ये त्याचे क्रीडा कारकिर्दीत क्रीडा मार्गदर्शकांकडे प्राथमिक प्रशिक्षण, मूलभूत प्रशिक्षण व प्रगत प्रशिक्षण घेतलेला कालावधी, ठिकाण याचा तपशिल देणे आवश्यक राहील. |
| ३.१७ | खेळाडूंनी प्रशिक्षण घेतलेला कालावधी सातत्यपूर्ण व किमान ३ वर्ष असणे आवश्यक आहे. आठवडयातून एक दिवस, शनिवार व रविवार, तसेच उन्हाळी हिवाळी लघू कालावधितील प्रशिक्षण शिबीरे, स्पर्धापूर्व प्रशिक्षण शिबीर इ. काळात क्रीडा मार्गदर्शकांनी दिलेले प्रशिक्षण हे सातत्यपूर्ण क्रीडा प्रशिक्षण समजले जाणार नाही. अशा बाबींचा उल्लेख हमीपत्रात करण्यात येवू नये. |
| ३.१८ | दिर्घ कालावधी म्हणजेच सातत्यपूर्ण ३ वर्ष क्रीडा मार्गदर्शकाकडे घेतलेल्या कामगिरीचा पुरस्कारासाठी विचार करण्यात येईल, याबाबत दिशाभूल केल्यास क्रीडा मार्गदर्शक व |

| | |
|---|---|
| | खेळाडू कायदेशीर कारवाईसाठी पात्र राहतील यापूर्वीच्या पुरस्कारासाठी क्रीडा मार्गदर्शक यांनी खेळाडूंची सादर केलेली हमीपत्रे व अर्जासोबत सादर केलेल्या हमीपत्रात तफावती (कालावधी, ठिकाण, मार्गदर्शकांचे नावात बदल इ.) निदर्शनास आल्यास अशा खेळाडूंची कामगिरी मूल्यांकन करण्यात येणार नाही. |
| ३.१९ | खेळाडूंनी क्रीडा मार्गदर्शकास पुरस्कारासाठी हमीपत्र देवून तांत्रिक कारणास्तव मागे घेणे, फसवणूक करुन हमीपत्र घेतले असून त्यांनी पुरस्कारासाठी वापर करणार असल्याचे माहिती न देणे अशा बाबींमुळे एखाद्या खेळाडूंने तक्रार केल्यास क्रीडा मार्गदर्शकाचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल. अशा मार्गदर्शकाचा काळ्या यादीत समावेश करुन पुढील ५ वर्ष पुरस्कार अर्ज करण्यास अपात्र ठरविण्यात येईल. |
| ३.२० | मुळ क्रीडा मार्गदर्शकाने अर्जासोबत घडविलेल्या खेळाडूची विहीत नमुन्यातील हमी प्रतिज्ञापत्रावर **परिशिष्ट -३.१** नुसार देणे आवश्यक राहील. |
| ३.२१ | संघाबरोबर केवळ स्पर्धा कालावधीकरीता गेलेल्या प्रशिक्षकाची कामगिरी गुणांकनासाठी ग्राह्य धरली जाणार नाही. |
| ३.२२ | उत्कृष्ट क्रीडा पुरस्काराने सन्मानित केलेल्या क्रीडा मार्गदर्शकाने घडविलेल्या खेळाडूने उत्तेजक द्रव्य (डोपींग) घेतल्याचे आढळून आल्यास व उत्तेजक द्रव्यामुळे खेळाडूने संपादन केलेल्या कामगिरीचा विचार उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक पुरस्काराकरिता झाला असल्यास अशा खेळाडूच्या मार्गदर्शकास देण्यात आलेला उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार रद्द करण्याचे अधिकार शासनास राहतील. |
| ३.२३ | सोबत जोडलेल्या **परिशिष्ट - ३.२** मधील गुणकोष्टकानुसार घडविलेल्या खेळाडूंच्या कामगिरीनुसार गुणांकनानंतर गुणानुक्रमे प्रथम येणारे क्रीडा मार्गदर्शक पुरस्कारा करिता पात्र ठरतील. समान गुणांकन आल्यास अत्युच्च कामगिरी विचारात घेण्यात येईल. तसेच क्रीडा मार्गदर्शकांचे गुण समान असतील व दोन्ही मार्गदर्शकाने घडविलेल्या खेळाडूंची अत्युच्च कामगिरी समान असेल अशा वेळी वयाने जेष्ठ असलेल्या क्रीडा मार्गदर्शकाचा प्राधान्याने पुरस्कारासाठी विचार करण्यात यावा. |
| ३.२४ | शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू) नियम २०२३ मधील **परिशिष्ट -३.२** मधील कोष्टकानुसार पुरस्कार वर्षाच्या लगतपुर्व पाच वर्षात थेट पुरस्कारासाठी पात्र ठरणाऱ्या खेळाडूंचा क्रीडा मार्गदर्शक थेट पुरस्कारासाठी पात्र राहील. तथापि, अशा क्रीडा मार्गदर्शकाने वरिष्ठ राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत प्राविण्य प्राप्त किंवा अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व केलेले असे दोन्ही मिळून एकूण किमान ८ खेळाडू दिव्यांगासाठी, १२ खेळाडू वैयक्तिक खेळ व १५ खेळाडू सांघिक खेळासाठी घडविलेले असणे आवश्यक राहील. |
| ३.२५ | शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (दिव्यांग खेळाडू) नियम, २०२३ मधील नियम, - **परिशिष्ट ६.१** नुसार थेट पुरस्कारासाठी पात्र ठरणाऱ्या दिव्यांग खेळाडूंना घडविणारा मार्गदर्शक थेट पुरस्कारासाठी पात्र राहील. तसेच संबंधित क्रीडा मार्गदर्शकाने वरिष्ठ राष्ट्रीय पॅरा क्रीडा स्पर्धेत प्राविण्य प्राप्त किंवा अधिकृत आंतरराष्ट्रीय पॅरा स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व केलेले असे दोन्ही मिळून एकूण किमान ०८ खेळाडू वैयक्तिक खेळ व ०८ खेळाडू सांघिक खेळासाठी घडविलेले असणे आवश्यक राहील. |
| ३.२६ | क्रीडा मार्गदर्शकांसाठी असणाऱ्या गुणांकन तक्त्यामध्ये नमूद केलेल्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये संबंधित खेळाडूंच्या प्रत्येक वैयक्तिक क्रीडा प्रकारात/वजन गट/इव्हेंट मध्ये किमान ६ देशाच्या ६ खेळाडूंनी व सांघिक क्रीडा प्रकारात किमान ६ देशाच्या ६ संघांचा सहभाग असल्यासच सदर स्पर्धेमधील कामगिरीचे गुणांकन करण्यात येईल. |
| ३.२७ | क्रीडा मार्गदर्शकाने अर्जासोबत सादर केलेल्या एखाद्या खेळाडूच्या प्रमाणपत्रावर एका पेक्षा अधिक इव्हेंट/बाबी नमूद केल्या असतील अशा प्रमाणपत्रातील ज्या बाबी/इव्हेंटमध्ये उच्च |

| | |
|---|---|
| | कामगरी असेल अशा एकाच बाबी/इव्हेंटची कामगिरी गुणांकनाकरीता ग्राह्य धरण्यात येइल. |
| ३.२८ | महाराष्ट्रातील क्रीडा मार्गदर्शकास चालू पुरस्कार वर्षातील केंद्र शासनाचा द्रोणाचार्य पुरस्कार प्राप्त झाला असल्यास अशा क्रीडा मार्गदर्शकास जादाचा थेट पुरस्कार प्रदान करण्यात येईल. |

## परिशिष्ट ३.१

### खेळाडूनिहाय स्वतंत्र हमीपत्र देण्यात यावे (१०० रु. च्या बाँड पेपर वर देण्यात यावे)

### (एक खेळाडू एका प्रशिक्षकाला एकदाच हमीपत्र देतील)

मी श्री. / श्रीमती ....................................................................खालील सही करणार ............................ या खेळाचा/खेळाची राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय खेळाडू आहे.-------------- वर्ष मी क्रिडा प्रशिक्षण घेतलेले आहे. मी खालील क्रीडा मार्गदर्शकाकडे प्राथमिक प्रशिक्षण, मूलभूत प्रशिक्षण व प्रगत/अद्यावत प्रशिक्षणाचे मार्गदर्शन घेतलेले आहे. यापूर्वी खालील क्रीडा मार्गदर्शक वगळता कोणत्याही क्रीडा मार्गदर्शकास हमीपत्र दिलेले नाही.

| अ.क्र. | क्रीडा मार्गदर्शकाचे नांव | ठिकाण | कालावधी |
|---|---|---|---|
| **प्राथमिक प्रशिक्षण ( Basic )** | | | |
| | | | |
| **मूलभूत प्रशिक्षण ( Elite )** | | | |
| | | | |
| **प्रगत/अद्यावत प्रशिक्षण ( High Perfomance )** | | | |
| | | | |

(खेळाडूस क्रीडा मार्गदर्शकाने किमान ०३ वर्षे प्रशिक्षण दिलेले असणे आवश्यक आहे. अल्प कालावधीतील शिबीर व स्पर्धा यावेळी केलेले क्रीडा प्रशिक्षक यांची नावे नमूद करु नयेत.)

क्रीडा कामगिरीचा तपशील- (पुरस्कार वर्षालगतपूर्व १५ वर्षांची कामगिरी लक्षात घेण्यात येईल.)

खालील राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभाग व प्राविण्य प्राप्त केले आहे.

| अ.क्र. | स्पर्धेचे नाव | वर्ष | आयोजन संघटना | प्राविण्य/ सहभाग |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |
| ४. | | | | |
| ५. | | | | |
| ६. | | | | |

वर नमूद स्पर्धेमध्ये सहभाग घेऊन संपादन केलेले यश हे मला माझे क्रीडा मार्गदर्शक श्री. / श्रीमती .............................. यांच्या प्रशिक्षणामध्ये प्राप्त झालेले आहे व त्यांनी मला दि. ........... ते दि........... पर्यंत एकूण ................ वर्ष प्रशिक्षण दिलेले आहे. पुरस्कार नियमावलीतील नियम ...... मध्ये नमूद केल्याप्रमाणे या क्रीडा मार्गदर्शकाने मला एकूण .............. वर्षे प्रशिक्षण दिले आहे ही अट पुर्ण होत असल्याने सदरचे हमीपत्र मी देत आहे.

वरील कालावधीत नमुद केलेल्या स्पर्धांचे प्रमाणपत्र व क्रीडा प्रशिक्षण दिलेबाबत मी यापूर्वी अन्य क्रीडा मार्गदर्शकाला हमीपत्र दिलेले नाही. वरील सर्व माहिती मान्य असल्याचे मी प्रतिज्ञापत्रावर लिहून देत आहे. उपरोक्त माहिती खोटी/चुकीची आढळल्यास मी वैयक्तिक जबाबदार राहीन. याबाबत माझेवर कायदेशीर गुन्हा नोंदविण्यास हरकत नाही.

तसेच मी जिल्हा व राज्य क्रीडा पुरस्कारासाठी अर्ज करण्यास अपात्र राहीन याची मला जाणीव आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| दिनांक | | खेळाडूची स्वाक्षरी | |
| ठिकाण | | खेळाडूचे संपूर्ण नांव | |

******************

<u>परिशिष्ट - ३.२</u>

<u>गुणांकन कोष्टक</u>

**थेट पुरस्काराकरीता पात्र क्रीडा स्पर्धा व गुणांकनासाठी पात्र कामगिरी**

<table>
<tr><th rowspan="2">अ. क्र</th><th rowspan="2">क्रीडा स्पर्धेचा स्तर</th><th colspan="4">स्पर्धेतील खेळाडूंची कामगिरी</th></tr>
<tr><th>पहिला क्रमांक</th><th>दुसरा क्रमांक</th><th>तिसरा क्रमांक</th><th>सहभाग</th></tr>
<tr><td>१.</td><td>ऑलिंपिक गेम्स/पॅरालिंपिक गेम्स्</td><td>थेट पुरस्कार</td><td>थेट पुरस्कार</td><td>थेट पुरस्कार</td><td>थेट पुरस्कार</td></tr>
<tr><td>२.</td><td>जागतिक अजिंक्यपद स्पर्धा (वरिष्ठ गट)/जागतिक पॅरा क्रीडा स्पर्धा (चार वर्षांनी आयोजित होणारी)<br>जागतिक चषक (वरिष्ठ गट)(चार वर्षांनी आयोजित होणारी)<br>एशियन गेम्स/पॅरा एशियन गेम्स<br>कॉमनवेल्थ गेम्स/पॅरा कॉमनवेल्थ गेम्स</td><td>थेट पुरस्कार</td><td>थेट पुरस्कार</td><td>थेट पुरस्कार</td><td>०६ गुण</td></tr>
<tr><td rowspan="2">३.</td><td>ग्रँडस्लॅम स्पर्धा/डेव्हीस कप/फेड कप भारतीय संघाचे प्रतिनिधीत्व (वर्ल्ड ग्रुप व आशियाई ओशानीया ग्रुप) प्राविण्य (फक्त लॉन टेनिससाठी)<br>(वरिष्ठ गट फक्त)</td><td>थेट पुरस्कार</td><td>थेट पुरस्कार</td><td>थेट पुरस्कार</td><td>०६ गुण</td></tr>
<tr><td>थॉमस कप/उबेर कप बॅडमिंटन स्पर्धा</td><td>थेट पुरस्कार</td><td>थेट पुरस्कार</td><td>थेट पुरस्कार</td><td>०६ गुण</td></tr>
<tr><td>४.</td><td>जागतिक बुध्दीबळ संघटना (फिडे) मधील आंतरराष्ट्रीय ग्रँड मास्टर,<br>आंतरराष्ट्रीय महिला ग्रँड मास्टर,<br>किताब प्राप्त करणारे खेळाडू</td><td colspan="3">थेट पुरस्कार</td><td>--</td></tr>
</table>

<u>परिशिष्ट -३.३</u>

| अ. क्र. | स्पर्धेचा प्रकार | प्रथम क्रमांक | द्वितीय क्रमांक | तृतीय क्रमांक | सहभाग |
|---|---|---|---|---|---|
| १. | आशियाई अजिंक्यपद/आशियाई चषक स्पर्धा/आशियाई पॅरा अजिंक्यपद स्पर्धा | १० गुण | ८ गुण | ६ गुण | ४ गुण |
| २. | कॉमनवेल्थ अजिंक्यपद स्पर्धा,<br>जाग़तिक क्रीडा स्पर्धा/जागतिक अजिंक्यपद स्पर्धा/जागतिक चषक स्पर्धा (वरिष्ठ गट) (प्रतिवर्षी/दोन वर्षांनी आयोजित होणा-या),<br>आंतरराष्ट्रीय मास्टर/ आंतरराष्ट्रीय महिला मास्टर चेस,<br>वर्ल्ड लीग हॉकी स्पर्धा,<br>कॉमनवेल्थ पॅरा अजिंक्यपद स्पर्धा,<br>आंतरराष्ट्रीय क्रीकेट एक दिवसीय/टेस्ट सिरीज,<br>२०-२० क्रीकेट<br>(सदर स्पर्धेत वैयक्तिक प्रत्येक क्रीडा प्रकार/वजनगटात/इव्हेंट मध्ये किमान ६ देशाच्या ६ खेळाडूंनी व सांघिक क्रीडा प्रकारात किमान ६ देशाच्या ६ संघानी सहभाग घेतलेला असणे आवश्यक राहील) | ८ गुण | ६ गुण | ४ गुण | २ गुण |
| ३. | जागतिक आंतर विद्यापीठ स्पर्धा | ७ गुण | ५ गुण | ३ गुण | १ गुण |
| ४. | हिंद केसरी किताब विजेता | ६ गुण | ४ गुण | २ गुण | १ गुण |
| ५. | युथ ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा, रणजी ट्रॉफी/दुलीप ट्रॉफी/देवघर ट्रॉफी/ इराणी ट्रॉफी/कुचबिहार ट्रॉफी, भारतीय ए संघासाठीचे आंतरराष्ट्रीय क्रीकेट एक दिवसीय/टेस्ट सिरीज, २०-२० क्रीकेट | ५ गुण | ३ गुण | २ गुण | -- |
| ६. | फेडरेशन कप (वरीष्ठ गट),<br>वरीष्ठ राष्ट्रीय अजिंक्यपद क्रीडा स्पर्धा पदक प्राप्त करणारा खेळाडू,<br>वरिष्ठ पॅरा राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा,<br>रणजी क्रिकेट स्तरावरील स्पर्धेमध्ये प्राविण्य प्राप्त संघाचा खेळाडू<br>राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा (National Games) पदक प्राप्त करणारा खेळाडू | ४ गुण | ३ गुण | २ गुण | १ गुण |
| ७. | जागतिक/एशियन शालेय क्रीडा स्पर्धा,<br>खेलो इंडिया वरिष्ठ गट | ३ गुण | २ गुण | १ गुण | -- |
| ८. | सुदीरमन कप बॅडमिंटन स्पर्धा, | २० गुण | १५गुण | १०गुण | ६ गुण |

| नियम क्र.४ | शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू) |
|---|---|
| ४.१ | या नियमांना **"शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू) नियम, २०२३"** असे संबोधण्यात यावे. |
| ४.२ | क्रीडा क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महाराष्ट्रातील खेळाडूंचा गौरव करण्याच्या दृष्टीने या नियमावलीनुसार सदर पुरस्कार प्रदान करण्यात येतील. |
| ४.३ | केंद्र शासनाकडुन “अर्जुन पुरस्कार” प्राप्त झाल्यास शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार थेट पध्दतीने बहाल करण्यात येईल व तो “जादाचा पुरस्कार” समजला जाईल. त्यासाठी अर्ज करण्याची आवश्यकता असणार नाही. |
| ४.४ | खेळाडूने थेट पुरस्कारासाठी ग्राह्य धरण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धामधील कामगिरी (**परिशिष्ट अ-४.३** नुसार) संपादन केली असल्यास थेट पुरस्कारासाठी पात्र राहील. सदरचा पुरस्कार जादाचा पुरस्कार समजण्यात येईल. |
| ४.५ | जलतरण क्रीडा प्रकारामध्ये जलतरण या उपप्रकारासाठी एक तर डायव्हींग/वॉटरपोलो या उपप्रकारासाठी चक्राकार पद्धतीने एक या प्रमाणे तसेच जिम्नॅस्टीक्स क्रीडा प्रकारामध्ये आर्टीस्टीक जिम्नॅस्टीक्स या प्रकारासाठी एक, रिदमिक जिम्नॅस्टीक्स व ट्रॅम्पोलीन या दोन उपप्रकारासाठी चक्राकार पद्धतीने एक या प्रमाणे पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र पुरस्कार देण्यात येईल. |
| ४.६ | पुरस्कारासाठी असलेल्या क्रीडा प्रकारांची यादी **परिशिष्ट ४.४** येथे नमूद करण्यात आलेली आहे. |
| ४.७ | ज्या खेळात वैयक्तिक कामगिरीवर विजेते अथवा उपविजेतेपद ठरले जाते ते खेळ अथवा क्रीडा प्रकार वैयक्तिक खेळ म्हणून संबोधण्यात येतील. उदा. कुस्ती, ॲथलेटिक्स (रिले सोडून), बॅडमिंटन (एकेरी), टेबलटेनिस (एकेरी) इत्यादी. |
| ४.८ | ज्या खेळामध्ये दोन अथवा दोनपेक्षा जास्त खेळाडू एकत्रित खेळून सांघिक कामगिरीच्या आधारावर विजेते/उपविजेते पद मिळवितात अशा क्रीडा प्रकारांना सांघिक खेळ म्हणून संबोधण्यात यावे. उदा. ॲथलेटिक्स (रिले), बॅडमिंटन (दुहेरी/मिश्र), टेनिस (दुहेरी/मिश्र), टेबलटेनिस (दुहेरी/मिश्र) इत्यादी. |
| ४.९ | अर्ज करण्याची पध्दत-<br>१. या पुरस्काराकरिता खेळाडूंना वैयक्तिकरित्या (संबंधित राज्य क्रीडा संघटनेच्या शिफारशीसह) ऑनलाईन अर्ज करता येईल.<br>२. खेळाडूंची सलग पाच वर्षातील राज्य/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय पातळीवर मिळविलेल्या क्रीडा नैपुण्य विषयक कामगिरी संबंधीच्या प्रमाणपत्राच्या झेरॉक्स प्रती सादर कराव्यात व त्या सक्षम अधिकाऱ्यानी प्रमाणित केलेल्या असाव्यात. राष्ट्रीय क्रीडा महासंघाने/एकविध खेळाच्या राज्य संघटनेने प्रदान केलेल्या विजेतेपदाबाबतच्या प्रमाणपत्रांच्या स्वसाक्षांकीत सत्यप्रती.<br>३. महाराष्ट्र राज्यातील अधिवास प्रमाणपत्र.<br>४. खेळाडूचे पासपोर्ट आकाराचे पाच फोटो.<br>५. कार्यकारी समितीने संमत केलेल्या ठरावाची प्रत.<br>६. पुरस्कार वर्षालगत पुर्व पाच वर्षामध्ये राष्ट्रीय/राज्यसंघटनेने आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय/राज्यस्तरीय अधिकृत अजिंक्यपद स्पर्धाची ठिकाणे व कालावधी या बाबतची माहिती संघटनेचे सचिव व अध्यक्ष यांनी स्वाक्षांकित करुन **परिशिष्ट -४.१** मध्ये विहित केलेल्या नमुन्यात **परिशिष्ट-४.२** मधील प्रमाणपत्रासह सादर करावीत.<br>७. खेळाडूने विहित नमुन्यातील वैयक्तिक तपशिला सोबत वर नमूद केलेली कागदपत्रे स्वसाक्षांकीत करुन जोडावीत. सादर केलेले प्रमाणपत्र खोटे आहे असे आढळून आल्यास त्या खेळाडू विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात यावी. |
| ४.१० | संबंधित खेळाडूची पुरस्कार वर्षातील ३० जून रोजी संपणाऱ्या वर्षासह लगतपूर्व पाच वर्षातील वरिष्ठ |

| | |
|---|---|
| | आंतरराष्ट्रीय, वरिष्ठ राष्ट्रीय, वरिष्ठ राज्य अजिंक्यपद स्पर्धेमधील कामगिरी पुरस्कारासाठी विचारात घेण्यात येईल. उदाहरणार्थ, जर सदर पुरस्कार हा सन २०२२-२३ करीता देण्यात येत असेल तर दि. ३० जून २०२३ रोजीपर्यंतची व त्यामागील पाच वर्षातील कामगिरी पुरस्काराकरीता ग्राह्य मानण्यात येईल. |
| ४.११ | खेळाडूने पुरस्कार वर्षापासून लगतपुर्व ५ वर्षामध्ये कोणत्याही तीन वर्षात अधिकृत संघातर्फे संबंधित खेळाच्या अधिकृत राष्ट्रीय फेडरेशनमार्फत आयोजित वरिष्ठ गटाच्या (सिनीअर) राष्ट्रीय स्पर्धेमध्ये/राष्ट्रीय स्पर्धा (नॅशनल गेम्स) मध्ये महाराष्ट्राच्या प्रातिनिधीक संघाकडून सहभागी होवून किमान एक पदक (प्राविण्य) संपादन केले आहे अशा खेळाडूंचा पुरस्कारासाठी पात्रतेकरीता व गुणांकनाकरिता विचार करण्यात येईल. एकाच वर्षामध्ये वरिष्ठ राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा व राष्ट्रीय स्पर्धा (नॅशनल गेम्स) आयोजित झालेल्या असतील तर त्या दोन स्वतंत्र राष्ट्रीय स्पर्धा गणण्यात येतील. |
| ४.१२ | थेट पुरस्काराकरिता पात्र असलेल्या खेळाडूस (**परिशिष्ट ४.३** नुसार) लगतच्या पाच वर्षांपैकी किमान एक वर्षातील राष्ट्रीय स्पर्धेतील पदक संपादन केले असल्याची अट लागू राहणार नाही. |
| ४.१३ | पुरस्कारासाठी ग्राह्य धरण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धामध्ये एकदा सहभाग व नॅशनल गेम्स् व राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा यामध्ये दोन वर्षे सहभाग घेवून प्राविण्य संपादन केले असल्यास असा खेळाडू गुणांकनानुसार पुरस्कारासाठी पात्र राहील. अशा खेळाडूस तीन वरिष्ठ राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होऊन प्राविण्य संपादित करण्याची अट लागू राहणार नाही. (सदरची कामगिरी पुरस्कार मुल्यांकनासाठी ग्राह्य धरण्यात आलेल्या ५ वर्षामधील असणे आवश्यक आहे. तसेच सदर खेळाडूने या तिन्ही वर्षांपैकी वरीलपैकी कोणत्याही स्पर्धेमध्ये किमान एक पदक संपादित केलेले असणे अनिवार्य राहील) |
| ४.१४ | काही खेळांमध्ये जागतिक अजिंक्यपद स्पर्धा किंवा जागतिक चषक स्पर्धा या दर चार वर्षांनी, दर दोन वर्षांनी किंवा दरवर्षी आयोजित होत असतात. थेट पुरस्कारासाठी विचार करताना यापैकी जास्तीत जास्त दीर्घ कालावधी नंतर आयोजित केलेल्या स्पर्धांमधील कामगिरी ग्राह्य धरण्यात येईल. |
| ४.१५ | गुणांकनासाठी ग्राह्य धरल्या जाणाऱ्या क्रीडा स्पर्धांचे गुणकोष्टक **परिशिष्ट ४.३, ४.५ व ४.६** नुसार गणण्यात येईल. |
| ४.१६ | ज्या खेळामध्ये वैयक्तिक व सांघिक अशा संयुक्त स्पर्धा होतात (उदा. ॲथलेटीक्स्, जिम्नॅस्टीक्स्, जलतरण, टेनिस, टेबल टेनिस, बॅडमिंटन इ.) अशाच खेळांसाठी खालील देण्यात आलेले गुणोत्तर प्रमाण ग्राहय धरण्यात येईल व त्यानुसार क्रीडा कामगिरीचे गुणांकन करण्यात येईल. ज्या खेळांमध्ये फक्त सांघिक स्पर्धा अथवा फक्त वैयक्तिक स्पर्धा असतील तर त्यांच्या क्रीडा कामगिरीचे नियमित सर्व साधारण गुणांकनानुसार गुणांकन करण्यात येईल.<br>१. सांघिक क्रीडा प्रकारासाठी गुणांकन हे संघातील खेळाडूच्या संख्येनुसार गणण्यात येईल.<br>२. एखादया वैयक्तिक प्रकाराचे गुणांकन A आहे. तर सांघिक क्रीडा प्रकाराचे गुणांकन खालीलप्रमाणे करण्यात येईल.<br>उदा. एका संघात दोन खेळाडू असतील तर :- १.५ X A ÷संघातील खेळाडू संख्या (A म्हणजे उदा.आशियाई अजिंक्यपद स्पर्धा - प्रथम क्रमांक १२ गुण) १.५ X १२ ÷२ =९ गुण<br>एका संघात तीन किंवा चार खेळाडू असतील तर :-२ X A ÷संघातील खेळाडू संख्या २ X १२ ÷४ = ६ गुण<br>एका संघात पाच ते दहा खेळाडू असतील तर :- ३ X A ÷संघातील खेळाडू संख्या ३ X १२ ÷५ = ७.२ गुण<br>एका संघात दहा पेक्षा अधिक खेळाडू असतील तर :- ५ X A ÷संघातील खेळाडू संख्या ५ X १२ ÷११ = ५ गुण<br>३. हा नियम ज्या खेळामध्ये वैयक्तिक व सांघिक अशा संयुक्त स्पर्धा होतात (उदा. ॲथलेटीक्स**,** |

| | |
|---|---|
| | जिम्नॅस्टीक्स,जलतरण, टेबल टेनिस, बॅडमिंटन इ.) अशाच बाबींसाठी सदरचे देण्यात आलेले गुणोत्तर प्रमाण (अर्जुन अवार्ड प्रमाणे) ग्राह्य धरण्यात यावे. फक्त सांघिक खेळ अथवा फक्त वैयक्तिक खेळाच्या स्पर्धा असतील तर देण्यात आलेले गुणोत्तर प्रमाण(अर्जुन पुरस्कारा प्रमाणे)लागू राहणार नाही. नियमित सर्व साधारण गुणांकनानुसार गुणांकन करण्यात येईल. |
| ४.१७ | दिनांक १ जुलै ते ३० जून या कालावधीत दोन किंवा अधिक वरिष्ठ राष्ट्रीय / वरिष्ठ राज्यस्तर अजिंक्यपद स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असेल तर त्या स्पर्धांची विभागणी गुणांकनासाठी त्या त्या वर्षात करण्यात येईल. तथापि नॅशनल गेम्स मधील सहभाग किंवा पदक याचे त्याच वर्षात अतिरीक्त स्वरूपात गुणांकन करण्यात येईल. |
| ४.१८ | जो खेळाडू भारतीय ऑलिम्पिक संघटनेने आयोजित केलेल्या नॅशनल गेम्स मध्ये महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधीत्व करणार नाही किंवा असे प्रतिनिधीत्व करण्यास नकार देईल असा खेळाडू पुरस्कारासाठी अर्ज करण्यास पात्र राहणार नाही. थेट पुरस्कारार्थीसाठी ही तरतूद लागू राहणार नाही. |
| ४.१९ | खेळाडूंच्या गुणांकनासाठी संबंधित खेळाडू सहभागी झालेल्या अधिकृत आंतरराष्ट्रीय किंवा राष्ट्रीय स्पर्धेमध्ये वैयक्तिक प्रत्येक क्रीडा प्रकारात - वजन गट/उपप्रकार व बाबींमध्ये किमान ६ देशांच्या ६ खेळाडूंनी व सांघिक क्रीडा प्रकारात किमान ६ देशांच्या ६ संघांनी सहभाग असल्यासच सदर स्पर्धेमधील कामगिरीचे गुणांकन करण्यात येईल. खेळाडूंच्या गुणांकनासाठी संबंधित खेळाडू सहभागी झालेल्या अधिकृत आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय स्पर्धेमधील स्पर्धा प्रकारात सहभागी देशांचा/ राज्यांचा नावासह सहभागाबाबतचे प्रमाणपत्र संबंधित खेळाच्या फेडरेशनने/ राज्य संघटनेने संबंधित खेळाडूला देण्यात यावे व संबंधित खेळाडूने आपल्या अर्जामध्ये सोबत सादर करावे. |
| ४.२० | खेळाडूंचा वरीष्ठ राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेतील सहभाग हा त्या-त्या खेळाच्या राज्य संघटनेमार्फत महाराष्ट्र राज्याच्या संघातून असला पाहिजे. महाराष्ट्राचा खेळाडू हा महाराष्ट्र राज्याच्या संघामार्फत जरी खेळलेला नसेल, तसेच तो इतर राज्यांच्या संघामार्फत ही खेळलेला नसेल मात्र उदर निर्वाहाकरीता तो रेल्वे, बँक, पोलिस, एअर इंडिया, पेट्रोलियम बोर्ड व इतर अशा अनेक संस्था/कंपनीमध्ये नोकरी करीत असेल व त्यांच्यामार्फत वरीष्ठ राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा खेळलेला असेल अशा महाराष्ट्राच्या रहिवासी असलेल्या खेळाडूंच्या क्रीडा कामगिरीचा गुणांकनासाठी विचार करण्यात येईल. |
| ४.२१ | अखिल भारतीय आंतरविदयापीठ स्पर्धेमध्ये सहभाग घेऊन प्राविण्य प्राप्त करणारा खेळाडू हा महाराष्ट्र राज्यातील अधिकृत विद्यापीठामार्फत सहभागी झालेला असावा. अशा खेळाडूंचाच अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धा क्रीडा कामगिरीचा गुणांकनाकरीता विचार करण्यात येईल. |
| ४.२२ | खेळाडूंच्या गुणांकनासाठी संबंधित खेळाडू सहभागी झालेल्या अधिकृत वरिष्ठ राज्यस्तर स्पर्धेमधील स्पर्धा प्रकारात संबंधित राज्य क्रीडा संघटनेने संलग्नता किंवा मान्यता दिलेल्या जिल्ह्यांपैकी **संबंधित क्रीडा प्रकाराच्या प्रत्येक वजनगटात**, कि**वा प्रत्येक उपप्रकारात** व स्पर्धांच्या बाबीमध्ये किमान ६० टक्के जिल्ह्यांच्या संघाचा/खेळाडूंचा सहभाग असल्यासच सदर स्पर्धेतील कामगिरीचे गुणांकन करण्यात येईल. |
| ४.२३ | सर्व स्तरावरील स्पर्धेतील सहभागी संघांची संख्या संबंधित राज्य क्रीडा संघटनेने त्या त्या वर्षी क्रीडा संचालनालयास सादर करणे बंधनकारक राहील. त्यासोबत स्पर्धेचे ड्रॉ सोबत जोडावे. |
| ४.२४ | सोबत जोडलेल्या **परिशिष्ट- ४.५ व ४.६** मधील गुण कोष्टकानुसार पुरस्कारासाठी परिगणित केलेल्या पाच वर्षांच्या कामगिरीपैकी सर्वोत्कृष्ट तीन वर्षात एकूण किमान १६ गुण प्राप्त केलेले खेळाडू पुरस्काराकरीता पात्र होतील. तथापि, अशा खेळाडूंपैकी सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या एक पुरूष व एक महिला यांची पुरस्कारासाठी निवड करण्यात येईल. |
| ४.२५ | एखाद्या खेळात दोन खेळाडूंना समान सर्वाधिक गुण प्राप्त झालेले असतील तर<br>१. समान गुणांकन आल्यास अत्युच्च कामगिरी विचारात घेण्यात येईल.<br>२. तसेच दोन्ही खेळाडूंची अत्युच्च कामगिरी समान असल्यास वयाने ज्येष्ठ असलेल्या खेळाडूची |

| | |
|---|---|
| | निवड पुरस्कारासाठी करण्यात येईल. |
| ४.२६ | पुरस्कारासाठी विचारात घेतलेल्या स्पर्धांच्या काळात जर खेळाडूने उत्तेजक द्रव्य (डोपिंग) घेतल्याचे आढळून आल्यास संबंधित खेळाडूस देण्यात आलेला पुरस्कार रद्द करण्याचे अधिकार शासनास राहतील. |
| ४.२७ | पुरस्कारासाठी अर्ज केलेल्या खेळाडूने सादर केलेली माहिती असत्य, चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे निदर्शनास आल्यास पुरस्कार रद्द करण्याचा अधिकार शासनास राहील व संबंधिता विरूद्ध भारतीय दंड संहितेनुसार कारवाई केली जाईल. |
| ४.२८ | वैयक्तिक या क्रीडा प्रकारात ग्रॅन्डस्लॅम (विंबल्डन, फ्रेंच ओपन, यू. एस. ओपन व ऑस्ट्रेलियन ओपन) स्पर्धा, डेव्हीस कप स्पर्धा, फेडरेशन कप स्पर्धा, एटीपी स्पर्धा व डब्ल्यूटीए स्पर्धा या सर्वोच्च महत्वाच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धा आहेत त्यामुळे या स्पर्धांमधील कामगिरीचा गुणांकनासाठी विचार करण्यात येईल. |
| ४.२९ | स्पोर्ट्स क्लायबिंग या खेळामध्ये इंडियन माउंटेनिअरिंग असो.या शब्दाऐवजी इंडियन माउंटेनिअरिंग फाउंडेशन, नवी दिल्ली असा शब्दप्रयोग वाचण्यात यावा व या खेळातील तीन उपप्रकार १. लीड, २. बोल्डरींग व ३. स्पीड या उपक्रमांमध्ये केलेल्या कामगिरीचा विचार करण्यात येईल. |
| ४.३० | रोईंग या क्रीडा प्रकारातील फक्त पाण्यावरील क्रीडा प्रकार पुरस्काराकरीता ग्राह्य धरण्यात येतील. |
| ४.३१ | खेळाडूने अर्जासोबत सादर केलेल्या एखाद्या खेळाडूच्या प्रमाणपत्रावर एका पेक्षा अधिक इव्हेंट/बाबी नमूद केल्या असतील अशा प्रमाणपत्रातील ज्या बाबी/इव्हेंटमध्ये उच्च कामगरी असेल अशा एकाच बाबी/इव्हेंटची कामगिरी गुणांकनाकरीता ग्राह्य धरण्यात येइल. |

## परिशिष्ट -४.१

## शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू) नियम

(१) खेळाडूचे नांव :-कुमार/कुमारी/श्री/श्रीमती -----------------------------------

(२) पत्ता :-

(३) खेळाचा प्रकार :-

| अ क्र | स्पर्धेचे नांव | स्पर्धेचा स्तर | ठिकाण | कालावधी | स्पर्धेतील कामगिरी प्रथम/व्दितीय/तृतीय | स्पर्धा अधिकृत अजिंक्यपद स्पर्धा आहे किंवा नाही, याबाबतचे स्वयंस्पष्ट अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |

## परिशिष्ट -४.२

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, कुमार/कुमारी/श्री/श्रीमती ------------------------------------ ----------खेळाडू नोंदणी क्रं. -------------------------------------------- हे/ या ---- ------------------------------------ या खेळाचा खेळाडू असून या खेळास भारतीय ------ -------------------------------( खेळाचे नांव लिहावे ) महासंघाची /महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनची / भारतीय ऑलिंम्पिक असोसिएशनची मान्यता आहे. कुमार/कुमारी/श्री/श्रीमती ------------------------------------यांनी अर्जामध्ये नमूद केलेली कामगिरी, संघटनेच्या कागदपत्रांनुसार बरोबर आहे/नाही. कुमार/कुमारी/श्री/श्रीमती ---------------------------- ------------ हे/ या शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारासाठी अर्ज करण्यास पात्र आहेत/नाहीत.

स्थळ :

दिनांक:

संघटनेची मोहोर

| (स्वाक्षरी) | (स्वाक्षरी) |
|---|---|
| सचिव | अध्यक्ष |
| संघटनेचे नाव | संघटनेचे नाव |

टिप : (१) अपात्र प्रमाणित केलेल्या खेळाडूबाबतची स्वयंस्पष्ट कारणमीमांसा स्वतंत्र कागदावर संघटनेचे सचिव व अध्यक्ष यांच्या संयुक्त सही शिक्यानिशी देण्यात यावी.

(२) लागू असेल तेथे ( )अशी खूण करावी.

## परिशिष्ट -४.३

## थेट पुरस्काराकरीता स्पर्धा प्रकार व कामगिरी

<table>
<tr><th rowspan="2">अ. क्र</th><th rowspan="2">क्रीडा स्पर्धेचा स्तर</th><th colspan="4">स्पर्धेतील खेळाडूंची कामगिरी</th></tr>
<tr><th>पहिला क्रमांक</th><th>दुसरा क्रमांक</th><th>तिसरा क्रमांक</th><th>सहभाग</th></tr>
<tr><td>१.</td><td>ऑलिंपिक गेम्स</td><td>थेट पुरस्कार</td><td>थेट पुरस्कार</td><td>थेट पुरस्कार</td><td>थेट पुरस्कार</td></tr>
<tr><td>२.</td><td>जागतिक अजिंक्यपद स्पर्धा (वरिष्ठ गट),<br>जागतिक चषक (वरिष्ठ गट)<br>एशियन गेम्स व कॉमनवेल्थ गेम्स</td><td>थेट पुरस्कार</td><td>थेट पुरस्कार</td><td>थेट पुरस्कार</td><td>--</td></tr>
<tr><td rowspan="3">३.</td><td>ग्रँडस्लॅम स्पर्धा/डेव्हीस कप/फेड कप भारतीय संघाचे प्रतिनिधीत्व (वर्ल्ड ग्रुप व आशियाई ओशानीया ग्रुप) प्राविण्य (फक्त लॉन टेनिससाठी)</td><td>थेट पुरस्कार</td><td>थेट पुरस्कार</td><td>थेट पुरस्कार</td><td>--</td></tr>
<tr><td>महाराष्ट्रातील एखादी महिला/पुरुष खेळाडू जर जागतिक क्रमवारीत एकेरी किंवा दुहेरीच्या अव्वल मानांकनामध्ये १०० क्रमांकाच्या आत असेल तर (फक्त लॉन टेनिससाठी)</td><td>थेट पुरस्कार</td><td>थेट पुरस्कार</td><td>थेट पुरस्कार</td><td>--</td></tr>
<tr><td>थॉमस कप/उबेर कप,ऑल इंग्लंड बॅडमिंटन स्पर्धा,</td><td>थेट पुरस्कार</td><td>थेट पुरस्कार</td><td>थेट पुरस्कार</td><td>--</td></tr>
<tr><td>४.</td><td>जागतिक बुध्दीबळ संघटना (फिडे) मधील आंतरराष्ट्रीय ग्रँड मास्टर,<br>आंतरराष्ट्रीय महिला ग्रँड मास्टर,<br>किताब प्राप्त करणारे खेळाडू</td><td colspan="3">थेट पुरस्कार</td><td>--</td></tr>
</table>

नियम क्र. ५ मधील ५.३ - काही खेळांमध्ये जागतिक अजिंक्यपद स्पर्धा किंवा जागतिक चषक स्पर्धा या दर चार वर्षांनी, दर दोन वर्षांनीकिंवा दरवर्षी आयोजित होत असतात. थेट पुरस्कारासाठी विचार करताना यापैकी जास्तीत जास्त दीर्घ कालावधी नंतर आयोजित केलेल्या स्पर्धांमधील कामगिरी ग्राहय धरण्यात येईल.

## परिशिष्ट - ४.४

## शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू) करीता पात्र क्रीडा प्रकार

| अ.क्र. | क्रीडा प्रकार | अधिकृत उप प्रकार | अधिकृत क्रीडा स्पर्धा |
|---|---|---|---|
| १ | ॲक्वेटिक्स | ऑलिंपिक, एशियन क्रीडा स्पर्धा, राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांमध्ये आयोजित केले जाणारे उपप्रकार व स्पर्धा बाबी पुरस्काराकरीता ग्राह्य मानले जातील. | १. ऑलिंपिक क्रीडा स्पर्धा<br>२. एशियन क्रीडा स्पर्धा<br>३. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा<br>४. जागतिक अजिंक्यपद स्पर्धा<br>५. जागतिक चषक / कप<br>६. एशियन चॅम्पियनशिप<br>७. एशियन चषक स्पर्धा<br>८. कॉमनवेल्थ चॅम्पियनशिप<br>९. साऊथ एशियन फेडरेशन क्रीडा स्पर्धा<br>१०. वर्ल्ड युनिवर्सिटी गेम्स<br>११. नॅशनल गेम्स<br>१२. वरीष्ठ राष्ट्रीय अजिंक्यपद क्रीडा स्पर्धा<br>१३. फेडरेशन कप क्रीडा स्पर्धा<br>१४. वरीष्ठ राज्य अजिंक्यपद क्रीडा स्पर्धा<br>१५. अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धा<br>१६. उपरोक्त क्रीडा स्पर्धांचे व्यतिरिक्त निवडक क्रीडा प्रकारांच्या बाबतीत आयोजित होणाऱ्या व गुणांकनाकरीता ग्राह्य धरल्या जाणाऱ्या विशिष्ट आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धांची नावनिहाय यादी **परिशिष्ट ४.६** अन्वये सोबत जोडली आहे. |
| २ | आर्चरी | | |
| ३ | ॲथलेटिक्स | | |
| ४ | बॅडमिंटन | | |
| ५ | बास्केटबॉल | | |
| ६ | बॉक्सिंग | | |
| ७ | कॅनोईंग | | |
| ८ | सायकलिंग | | |
| ९ | क्रिकेट | | |
| १० | तलवारबाजी | | |
| ११ | हॉकी | | |
| १२ | फुटबॉल | | |
| १३ | जिमनॅस्टिक्स | | |
| १४ | हॅन्डबॉल | | |
| १५ | ज्युदो | | |
| १६ | मॉडर्न पेन्टॅथलॉन | | |
| १७ | रग्बी सेव्हन | | |
| १८ | रोईंग | | |
| १९ | शुटींग | | |
| २० | स्पोर्टस क्लाइंबिंग | | |
| २१ | स्क्वॅश | | |
| २२ | टेबल टेनिस | | |
| २३ | तायक्वांदो | | |
| २४ | टेनिस | | |
| २५ | ट्रायथलॉन | | |
| २६ | व्हॉलीबॉल | | |
| २७ | वेटलिफ्टिंग | | |
| २८ | कुस्ती | | |
| २९ | स्केटिंग | | |
| ३० | वुशू | | |
| ३१ | सॉफ्टबॉल (महिला) | | |
| ३२ | बेसबॉल (पुरूष) | | |
| ३३ | कबड्डी | सदर क्रीडा प्रकारांचा समावेश पारंपारिक क्रीडा प्रकार म्हणून केला गेला असल्याने राष्ट्रीय स्तरावर आयोजित केले जाणारे उपप्रकार ग्राह्य धरण्यात येतील. | |
| ३४ | खो-खो | | |
| ३५ | मल्लखांब | | |
| ३६ | आट्यापाट्या | | |
| ३७ | बुद्धीबळ | | |
| ३८ | योगासने (नव्याने समावेश) | | |

**<u>महत्वाचे</u>** -

१. आर्चरी या खेळाकरिता पुरस्काराचे गुणांकन करताना इंडियन राऊंड ही स्पर्धा बाब गुणांकनाकरीता ग्राह्य धरण्यात येईल.

२. शिवछत्रपती क्रीडा पुरस्काराकरीता यापूर्वी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयात निश्चित करण्यात आलेल्या काही क्रीडा प्रकारांच्या कोणत्याही पायाभूत सुविधा किंवा तालुका/जिल्हास्तरावरील क्रीडा स्पर्धांचे आयोजन किंवा सदर क्रीडा प्रकाराचा राज्यातील प्रचार व प्रसार दिसून येत नसल्याने सदर क्रीडा प्रकार पुरस्काराकरीता पात्र क्रीडा प्रकारांच्या यादीतून वगळण्यात येत आहेत. सदर क्रीडा प्रकार पुढीलप्रमाणे आहेत- इक्वेस्टरियन, गोल्फ, यॉटींग.

३. शिवछत्रपती क्रीडा पुरस्काराकरीता यापूर्वी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयात निश्चित करण्यात आलेल्या काही क्रीडा प्रकारांचा आंतरराष्ट्रीय स्तरावरील महत्वाच्या मानल्या जाणाऱ्या ऑलिंपिक, आशियाई क्रीडा स्पर्धा व राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत समावेश नसल्याने सदर क्रीडा प्रकार पुरस्काराकरीता पात्र क्रीडा प्रकारांच्या यादीतून वगळण्यात येत आहेत. सदर क्रीडा प्रकार पुढीलप्रमाणे आहेत - पॉवरलिफ्टिंग, बॉडीबिल्डिंग, कॅरम, बिलीयर्डस अॅन्ड स्नुकर

४. पुरस्काराकरीता वरील पात्र क्रीडा प्रकारांचे व्यतिरिक्त अन्य एखाद्या क्रीडा प्रकारात ऑलिंपिक, आशियाई क्रीडा स्पर्धा व राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत राज्यातील खेळाडूने प्राविण्य संपादित केल्यास अशा खेळाडूस शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार थेट देण्याबाबतचा निर्णय शासन स्तरावरून घेतला जाईल.

## परिशिष्ट - ४.५
## सर्व साधारण गुणांकन

| अ. क्र. | क्रीडा स्पर्धेचा स्तर | स्पर्धेतील खेळाडूंची कामगिरी | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पहिला क्रमांक | दुसरा क्रमांक | तिसरा क्रमांक | सहभाग |
| १. | जागतिक अजिंक्यपद स्पर्धा / चषक (वरिष्ठ गट),वर्ल्ड चेस ऑलिंपियाड (सांघिक) वरिष्ठ गट /जागतिक चेस अजिंक्यपद स्पर्धा (वरिष्ठ गट - वैयक्तिक स्पर्धा)(दर दोन वर्षाने आयोजित होणारी स्पर्धा असेल तर) | १५ | १४ | १३ | ०६ |
| २. | जागतिक अजिंक्यपद स्पर्धा / चषक (वरिष्ठ गट) (दरवर्षी आयोजित होणारी स्पर्धा असेल तर) | ०८ | ०७ | ०६ | ०३ |
| ३. | एशियन गेम्स, कॉमनवेल्थ गेम्स (वरिष्ठ गट) | -- | -- | -- | ०५ |
| ४. | आशियाई अजिंक्यपद स्पर्धा (वरिष्ठ गट), आशियाई चषक (वरिष्ठ गट), राष्ट्रकुल अजिंक्यपद स्पर्धा (वरिष्ठ गट) | ०७ | ०६ | ०५ | ०२ |
| ५. | वर्ल्ड युनिव्हर्सिटी गेम्स, नॅशनल गेम्स्, राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा (वरिष्ठ गट), राष्ट्रीय फेडरेशन कप (वरिष्ठ गट), साऊथ एशियन स्पर्धा/गेम्स (वरिष्ठ गट) | ०५ | ०४ | ०३ | ०२ |
| ६. | राज्य अजिंक्यपद स्पर्धा (वरिष्ठ गट), अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा | ०३ | ०२ | ०१ | -- |

टिप -

१. काही खेळांमध्ये आशियाई अजिंक्यपद स्पर्धा किंवा आशियाई चषक स्पर्धा या दर दोन वर्षांनी किंवा दरवर्षी आयोजित होत असतात. गुणांकनासाठी विचार करताना यापैकी २/१ वर्षे कालावधी नंतर आयोजित केलेल्या स्पर्धांमधील कामगिरी (थेट पुरस्कारा व्यतिरिक्त) ग्राहय धरण्यात येईल.

२. परिशिष्ट (३.४) व (३.५) मधील प्राप्त होणा-या गुणांची बेरीज करुनच एकूण गुणांकन धरले जाईल.

३. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये वैयक्तिक उच्चांक केल्यास उच्चांकासाठी अतिरिक्त ५ गुण देण्यात येतील.

## परिशिष्ट - ४.६
## निवडक खेळांच्या विशिष्ट स्पर्धांसाठीचे गुणांकन
### क्रीडा प्रकार - लॉनटेनिस

| अ. क्र | क्रीडा स्पर्धेचा स्तर | स्पर्धेतील खेळाडूंची कामगिरी | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पहिला क्रमांक | दुसरा क्रमांक | तिसरा क्रमांक | सहभाग |
| १. | महाराष्ट्रातील एखादा महिला किंवा पुरुष खेळाडू जर ग्रँड स्लॅम स्पर्धेत एकेरी किंवा दुहेरीच्या पात्रता फेरी खेळल्यास (ग्रॅन्डस्लॅम (विंबल्डन, फ्रेंच ओपन, यू. एस. ओपन व ऑस्ट्रेलियन ओपन) स्पर्धा, डेव्हीस कप स्पर्धा, फेड कप स्पर्धा,) | -- | -- | -- | ०३ |
| २. | एटीपी स्पर्धा व डब्ल्यूटीए स्पर्धा | ०८ | ०७ | ०६ | ०३ |

### क्रीडा प्रकार - क्रिकेट

| अ. क्र. | क्रीडा स्पर्धेचा स्तर | स्पर्धेतील खेळाडूंची कामगिरी | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पहिला क्रमांक | दुसरा क्रमांक | तिसरा क्रमांक | सहभाग |
| १. | आंतरराष्ट्रीय क्रीकेट एक दिवसीय/टेस्ट सिरीज, २०-२० क्रीकेट | ०७ | ०६ | ०५ | ०२ |
| २. | रणजी ट्रॉफी/दुलीप ट्रॉफी/देवधर ट्रॉफी/ इराणी ट्रॉफी, कुचबिहार ट्रॉफी, भारतीय ए संघासाठीचे आंतरराष्ट्रीय क्रीकेट एक दिवसीय /टेस्ट सिरीज २०-२० क्रीकेट | ०५ | ०४ | ०३ | ०२ |

### क्रीडा प्रकार - फुटबॉल

| अ. क्र | क्रीडा स्पर्धेचा स्तर | स्पर्धेतील खेळाडूंची कामगिरी | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पहिला क्रमांक | दुसरा क्रमांक | तिसरा क्रमांक | सहभाग |
| १. | संतोष ट्रॉफी, फेडरेशन कप, बी.सी. राय ट्रॉफी | ०५ | ०४ | ०३ | ०२ |

### क्रीडा प्रकार - जिम्नॅस्टीक्स

| अ. क्र | क्रीडा स्पर्धेचा स्तर | स्पर्धेतील खेळाडूंची कामगिरी | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पहिला क्रमांक | दुसरा क्रमांक | तिसरा क्रमांक | सहभाग |
| १. | वर्ल्ड चॅलेंज कप सिरीज (वरिष्ठ गट) | ०७ | ०६ | ०५ | ०२ |

### क्रीडा प्रकार - टेबल टेनिस

| अ. क्र | क्रीडा स्पर्धेचा स्तर | स्पर्धेतील खेळाडूंची कामगिरी | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पहिला क्रमांक | दुसरा क्रमांक | तिसरा क्रमांक | सहभाग |
| १. | आय.टी.टी.एफ. प्रो टुर्स (वरिष्ठ गट) | ०७ | ०६ | ०५ | ०२ |

### क्रीडा प्रकार - बुध्दीबळ

| अ.क्र | क्रीडा स्पर्धेचा स्तर | स्पर्धेतील खेळाडूंची कामगिरी | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पहिला क्रमांक | दुसरा क्रमांक | तिसरा क्रमांक | सहभाग |
| १. | वर्ल्ड कप वरीष्ठ गट वैयक्तिक स्पर्धा | ०७ | ०६ | ०५ | ०२ |

### क्रीडा प्रकार - बॅडमिंटन

| अ. क्र | क्रीडा स्पर्धेचा स्तर | स्पर्धेतील खेळाडूंची कामगिरी | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पहिला क्रमांक | दुसरा क्रमांक | तिसरा क्रमांक | सहभाग |
| १. | सुदीरमन वर्ल्ड कप (संघटना आयोजित) (वरिष्ठ गट-सांघिक) | ०७ | ०६ | ०५ | ०२ |
| २. | थॅामस कप पुरुष व उबेर कप क्रीडा स्पर्धा (संघटना आयोजित) (वरिष्ठ गट) (एकेरी, दुहेरी)/ ऑल इंग्लड बॅडमिंटन स्पर्धा | -- | -- | -- | ०३ |
| ३. | सुपर सिरीज क्रीडा स्पर्धा - वैयक्तिक (एकेरी, मिश्र दुहेरी, दुहेरी), इंटरनॅशनल चॅलेंज क्रीडा स्पर्धा/इंटरनॅशनल सॅटेलाईट/ इंटरनॅशनल सिरीज क्रीडा स्पर्धा वैयक्तिक (एकेरी, मिश्र दुहेरी, दुहेरी), ग्रॅण्ड प्री गोल्ड क्रीडा स्पर्धा - वैयक्तिक (एकेरी, मिश्र दुहेरी, दुहेरी), ग्रॅण्ड प्री क्रीडा स्पर्धा - वैयक्तिक (एकेरी, मिश्र दुहेरी, दुहेरी) | ०५ | ०४ | ०३ | ०२ |

### क्रीडा प्रकार - हॉकी

| अ. क्र | क्रीडा स्पर्धेचा स्तर | स्पर्धेतील खेळाडूंची कामगिरी | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पहिला क्रमांक | दुसरा क्रमांक | तिसरा क्रमांक | सहभाग |
| १. | अझलन शाह हॉकी टुर्नामेंट वरीष्ठ गट, वर्ल्ड लीग फायनल चॅम्पियनशिप वरीष्ठ गट | ०७ | ०६ | ०५ | ०२ |
| २. | जोहर कप आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, आंतरराष्ट्रीय हॉकी सिरीज दोन देशांमधील | ०५ | ०४ | ०३ | ०२ |

### क्रीडा प्रकार - जलतरण, वॉटरपोलो व डायव्हींग

| अ. क्र | क्रीडा स्पर्धेचा स्तर | स्पर्धेतील खेळाडूंची कामगिरी | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पहिला क्रमांक | दुसरा क्रमांक | तिसरा क्रमांक | सहभाग |
| १. | फिना वर्ल्ड चॅम्पियनशिप वरीष्ठ गट | ०८ | ०७ | ०६ | ०३ |

### क्रीडा प्रकार - ॲथलेटीक्स

| अ.क्र | क्रीडास्पर्धेचास्तर | स्पर्धेतील खेळाडूंची कामगिरी | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पहिलाक्रमांक | दुसराक्रमांक | तिसराक्रमांक | सहभाग |
| १. | आंतरराष्ट्रीय परमिट मीट (वरिष्ठ गट) | ०८ | ०७ | ०६ | ०३ |

### क्रीडा प्रकार - ज्युदो

| अ.क्र | क्रीडा स्पर्धेचा स्तर | स्पर्धेतील खेळाडूंची कामगिरी | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पहिला क्रमांक | दुसरा क्रमांक | तिसरा क्रमांक | सहभाग |
| १. | जागतिक ग्रॅड स्लॅम (वरिष्ठ गट),जागतिक ग्रॅंड प्रिक्स (वरिष्ठ गट) | ०८ | ०७ | ०६ | ०३ |

## क्रीडा प्रकार – सायकलिंग

| अ.क्र | क्रीडा स्पर्धेचा स्तर | स्पर्धेतील खेळाडूंची कामगिरी | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पहिला क्रमांक | दुसरा क्रमांक | तिसरा क्रमांक | सहभाग |
| १. | ट्रॅक एशिया कप स्पर्धा (वरिष्ठ गट) | ०८ | ०७ | ०६ | ०३ |

## क्रीडा प्रकार – स्पोर्ट्स क्लायबिंग

| अ.क्र | क्रीडा स्पर्धेचा स्तर (भारतीय माउंटेनिअरिंग असो. नवी दिल्ली ) आयोजित | स्पर्धेतील खेळाडूंची कामगिरी | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पहिला क्रमांक | दुसरा क्रमांक | तिसरा क्रमांक | सहभाग |
| १. | पश्चिम विभाग स्तरीय क्रीडा स्पर्धा | ०३ | ०२ | ०१ | --- |
| २. | राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा | ०५ | ०४ | ०३ | ०१ |

*******************

# शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (साहसी उपक्रम ) नियम, २०२३.

| नियम क्र. ५ | शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (साहसी उपक्रम ) |
|---|---|
| ५.१ | या नियमांना **" शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (साहसी उपक्रम ) नियम, २०२३"** असे संबोधण्यात यावे. |
| ५.२ | साहस : एखादया व्यक्तीने जल, जमिन व आकाश यामधील साहसी क्रीडा प्रकारात नैसर्गिक प्रतिकुल परिस्थितीवर मात करुन तसेच त्याच्या जिवीतास असलेली जोखीम घेऊन परिपुर्ण केलेली कामगिरी म्हणजे साहस होय. अर्जदाराने वयाच्या १८ वर्षावरील केलेली कामगिरी पुरस्काराकरीता विचारात घेण्यात येईल. |
| ५.३ | **उद्दिष्ट:** साहसी क्रीडा प्रकारामध्ये विशेष उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील साहसी व्यक्तींचा गौरव करणे हे या पुरस्काराचे उद्दिष्ट आहे. |
| ५.४ | (१) केंद्र शासनाचा तेनझिंग नॉर्गे पुरस्कार प्राप्त करणा-या महाराष्ट्रातील व्यक्तीस “शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार **(साहसी उपक्रम )**” त्या वर्षासाठी थेट पुरस्कार देण्यात येईल.<br>(२) साहसी क्रीडा क्षेत्रातील आपल्या अतुलनीय कामगिरीने महाराष्ट्राच्या लौकिकात भर टाकणाऱ्या सुयोग्य व्यक्तींना “**शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (साहसी उपक्रम )**” देऊन सन्मानित करण्याचे अधिकार शासनास राहतील.<br>(३) जल, जमिन व आकाश या तीन स्वतंत्र साहसी क्रीडा प्रकारासाठी प्रत्येकी एक याप्रमाणे दरवर्षी एकूण ३ पुरस्कार देण्यात येईल. |
| ५.५ | **पात्रतेचे निकष:**<br>(१) पात्र पुरस्कारासाठी खेळाडूच्या कामगिरीचे मुल्यमापन करताना पुरस्कार वर्षाच्या लगतपुर्व ५ वर्षाची कामगिरी विचारात घेण्यात येईल. यामध्ये कौशल्य, विक्रम, साहसाची तीव्रता, घेतलेली जोखीम, काठीण्य पातळी, नैसर्गिक प्रतिकुलता, प्रतिकुल परिस्थिती यासारखी दृष्य परिमाणे तसेच संबंधित व इतर साहसी क्रीडा प्रकारातील योगदान, प्रशिक्षण व व्यवस्थापन विचारात घेतली जातील.<br>(२) साहसी क्रीडा पुरस्कारासाठी दि. १ जानेवारी ते दि. ३१ डिसेंबर हा कालावधी विचारात घेण्यात येईल.<br>(३) साहसी क्रीडा प्रकारातील अधिकृत खेळांची संघटना/संस्था/क्लब असल्यास ती राष्ट्रीय शिखर संघटनेला संलग्न असणे आवश्यक राहील.<br>(४) जल, स्थल व आकाश पुरस्कारासाठी आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्या अध्यक्षतेखाली उपसमिती स्थापन करावी. सदर उपसमितीमध्ये (जल, स्थल व आकाश) या प्रत्येक प्रकारामधील तज्ञ, साहसी क्रीडा प्रकारातील शिवछत्रपती पुरस्कारार्थी/तेनझिंग नॉर्गे पुरस्कारार्थी, अनुभवी व्यक्तींची/संस्थेच्या पदाधिकारी यांची/संबंधित संघटना असल्यास संघटनेच्या प्रतिनिधींचा समितीमध्ये समावेश असावा. उपसमिती सदस्यांची निवड करण्याचे अधिकार आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांना राहतील. सदर उपसमितीने प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन पुरस्कार निवड समितीस आपली शिफारस सादर करावी.<br>(५) प्रत्येक साहसी क्रीडा प्रकारातील साहस हे त्या त्या क्षेत्रातील वातावरणाच्या स्थितीचा, वयोगट, वेळ, उंची, अंतर, प्रतिकुल परिस्थिती, खेळ प्रकार, संस्था अधिकृत आहे अथवा नाही याबाबतचा खुलासा व अर्जदाराने केलेल्या साहस प्रकाराची कामगिरी कोणत्या संस्था/संघटना यांनी प्रमाणित केलेली आहे याबाबत सविस्तर विवरण ज्या त्या खेळाच्या प्रकारानुसार त्या त्या संस्थांच्या प्रमाणपत्रासह अर्जदाराने आपला अर्ज ऑनलाईन सादर करुन ऑनलाईन अर्जाची प्रिंट संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडे सादर करावे.<br>(६) एका क्रीडा प्रकारामध्ये जर दोन व्यक्तींची कामगिरी ही पुरस्कारासाठी पात्र होत असेल तर अशावेळी वयाने जेष्ठ असलेल्या व्यक्तीची निवड करण्यात यावी.<br>(७) व्यावसायिक कारणास्तव जमीन, हवाई व जल यामधील साहसी क्रीडा प्रकार आयोजित करण्यासाठी व्यावसायिक उपक्रमांचा विचार पुरस्कारासाठी करता येणार नाही.<br>(८) साहसी क्रीडा उपक्रम आयोजित करणारी संस्था ही नोंदणी संस्था अधिनियम १८६० अन्वये / धर्मादाय आयुक्तांकडे /कंपनी कायदा २०१३ च्या ना नफा तत्वावर झालेली असणे आवश्यक आहे. |

| | |
|---|---|
| | (९) देशातील/राज्यातील काही ठराविक भागात उपरोक्त साहसी उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी पूर्वपरवानगी आवश्यक असते. अशा ठिकाणी उपरोक्त साहसी उपक्रम आयोजित केले जाणार असतील तर केवळ तेथील गरजेनुसार त्या राज्यातील /देशातील नियमांनुसार आयोजकांनी तेथील सक्षम अधिका-यांची पूर्व परवानगी घेऊन पुर्ण केलेली साहसी कामगिरी विचारात घेतली जाईल. विम्याचे संरक्षण संपूर्ण उपक्रमाच्या कालावधीसाठी आयोजकांनी घेतलेले असावे.<br>(१०) साहसी उपक्रमाचे अधिकृत आयोजक संघटना/संस्था यांनी निश्चीत केलेली वयोमर्यादा पुर्ण केलेली असणे आवश्यक आहे. |
| ५.६ | **अर्ज करण्याची पध्दत :**<br>१) अर्जदाराने अर्जा सोबत अधिकृत प्रमाणपत्र, आवश्यक तेथे संबंधित विभागाचे परवानगी पत्र, व्हीडीओ रेकॉर्डींग व फोटो, प्रसिध्दी कात्रणे, साहस निरीक्षकांचा अहवाल, साहस कालावधी-स्थळ-उपस्थित मान्यवर-साहस दरम्यानचे वातावरण-मार्गदर्शक इ. कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.<br>२) ज्या जिल्हयातील खेळाडू त्यांनी संबंधित साहसाबाबतची, ज्या व्यक्ती साहसी उपक्रमात सहभागी झाल्या होत्या त्यांची माहिती, अर्जदाराचा रहिवास असलेला तपशिल संबंधित संस्थेमार्फत त्या जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. |
| ५.७ | **पुरस्कारासाठी पात्र साहसी प्रकार**<br>**अ) <u>जमिनीवरील साहसी क्रीडा प्रकार</u>**<br>१) **गिर्यारोहण** - अतिउंचीवरील शिखरांवर गिर्यारोहणाचे तांत्रिक कौशल्य आणि सुरक्षा साधनांचा वापर करुन केलेले आरोहण. तसेच गिर्यारोहणाच्या तांत्रिक बाबीचा स्वतंत्रपणे वापर करुन पुढील उपक्रम आयोजित केले जातात. - रॅपलिंग, वॉटरफॉल रॅपलिंग, व्हॅली क्रॉसिंग, टायरोलीन ट्रॅव्हर्स, जायंट स्वींग इत्यादी. सदर उपक्रम स्वतंत्रपणे आयोजित केले जात असले तरी ते उपक्रम गिर्यारोहणाचा भाग आहेत.<br>हिमालयातील गिर्यारोहण मोहीमांचे संपूर्ण नियमन इंडीयन माउंटेनिअरींग फाउंडेशन या राष्ट्रीय संघटनेमार्फत केले जाते. अशा मोहीमांचे नेतृत्व करणारे व त्यात भाग घेणारे गिर्यारोहण यांची पात्रता, प्रशिक्षण, अनुभव याबाबतचे निकष इंडीयन माउंटेनिअरींग फाउंडेशनने ठरविलेले आहेत. त्या निकषांनुसार हिमालयातील गिर्यारोहण केलेले असावे.गिर्यारोहण केलेल्या शिखराची उंची ६००० मी. पेक्षा अधिक असावी व सर्वोच्च उंची सर केलेल्या व्यक्तीस प्राधान्य देण्यात येईल. गिर्यारोहणातील साधन सामुग्रीचे प्रमाणीकरण करण्याचे कार्य इंटरनॅशनल माउंटेनियरिंग अँड क्लाइंबिंग फेडरेशन (युआयएए www.theuiaa.org) मार्फत केले जाते. त्यांनी प्रमाणित केलेली वैयक्तिक बचाव साधने गिर्यारोहण करताना वापरलेली असणे आवश्यक आहे.गिर्यारोहणासाठी वापरली जाणारी साधनसामुग्री, देखभाल, साठवणूक आणि तपासणी ही त्या त्या साधन सामुग्रीच्या उत्पादकाने दिलेल्या सूचनेप्रमाणे व गिर्यारोहणाच्या आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय राज्य शिखर संघटना यांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार असावे.<br>२) **<u>प्रस्तरारोहण</u>** -प्रस्तरखंड, प्रस्तर भिंती, प्रस्तर सुळके यांवर प्रस्तरारोहणाचे तांत्रिक कौशल्य आणि साधनांचा वापर करुन केलेले आरोहण. सुमारे ६० अंशापेक्षा जास्त कोन असलेल्या वेगवेगळया प्रस्तर भिंती, सुळके यांच्यावरील लहान लहान उंचवटे, खोबणी, खाचा, फटी, भेगा, कोपरे अशा नैसर्गिक वैगुण्यांचा, हाता पायांच्या सहाय्याने आधार घेत व सुरक्षेसाठी दोर, प्रस्तर खिळे इत्यादीचा वापर करुन प्रस्तर भिंती, सुळके यांच्यावर केलेले आरोहण म्हणजे प्रस्तरारोहण.<br>प्रस्तरारोहण उपक्रमांचे आयोजन इंडियन माउंटेनिअरींग फाउंडेशन या राष्ट्रीय शिखर संघटनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार केलेले असावे.<br>३) <u>सायकलवर देश प्रवास/जग प्रवास/आव्हानात्मक मोहिमा</u> - देशांतर्गत सायकलद्वारे पुर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर व मध्य या विभागातील राज्यांमधून प्रवास केलेला असावा. तर जग प्रवासामध्ये पाच खंडामधील विविध देशामधून प्रवास केलेला असावा.सायकल प्रवास हा दुर्गम पर्वत रांगा, मोहिमा, |

| | |
|---|---|
| | आंतरराष्ट्रीय स्तरावरील मोहिम, अल्ट्रा एंडूरन्स मोहिमा अशा मोहिमांची काठिण्य बाबी विचारात घेण्यात याव्यात. उदा. आयर्न मॅन म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर काठीण्य गणल्या जाणा-या उपक्रमांमधील कामगिरी ही विचारात घेतली जाईल. |
| ५.८ | **ब) हवाई साहसी खेळातील प्रकार**<br>१) हवेत उड्डानाचे तांत्रिक कौशल्य आणि सुरक्षा साधनांचा वापर करुन केलेले हवेतील साहस तथा उड्डान तसेच उड्डानांच्या तांत्रिक बाबींचा स्वतंत्रपणे वापर करुन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर पुढील उपक्रम आयोजित केले जातात. उदा. पॅराग्लायडींग, पॉवर पॅराग्लायडींग (पॅरामोटर), हँग ग्लायडींग, पॉवर हँग ग्लायडींग, पॅरा जंपिंग (स्काय डायव्हींग), ग्लायडींग, हॉट एअर बलून, मायक्रो लाईट इत्यादी खेळाच्या मोहीमा व स्पर्धा. सदर उपक्रम स्वतंत्रपणे आयोजित केले जात असले तरी ते उपक्रम हवेतील साहसी क्रीडा प्रकाराचा भाग आहेत. या हवेतील साहसी खेळांचे राष्ट्रीय पातळीवरील संपुर्ण नियमन दिल्लीच्या एअरो क्लब ऑफ इंडिया या राष्ट्रीय संघटनेमार्फत केले जाते. हवेतील साहसी क्रीडा प्रकारांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील मोहिमा व स्पर्धांचे नेतृत्व करणारे, त्यात भाग घेणारे स्पर्धक यांचे पात्रता, अनुभव याबाबतचे निकष एअरो क्लब ऑफ इंडियाने ठरविलेले आहेत. त्या निकषांनुसार उपरोक्त हवेतील साहसी खेळांच्या मोहिमा किंवा स्पर्धांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील आयोजन झालेले असावे.<br>२) हवाई साहसी क्रीडा प्रकारांसाठी वापरण्यात येणारे साहित्य हे FAI (फेडरेशन ऑफ एअरॉनॉटीक इंटरनॅशनल) या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या नियमाप्रमाणे अद्यावत असले पाहिजे. तसेच पायलट/मार्गदर्शक/पर्यायी पायलट यांचेकडे FAI (फेडरेशन ऑफ एअरॉनॉटीक इंटरनॅशनल) या आंतरराष्ट्रीय संस्थेचे पायलट प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.<br>३) त्यांनी योग्य त्या मान्यता प्राप्त संस्थेचे किमान दर्जाचे प्रथमोपचाराचे प्रशिक्षण घेतले असले पाहिजे.<br>४) त्यांनी किमान २०० दिवस हवेत उड्डान किंवा कमीत कमी १०० तास हवेत तरंगले असले पाहिजे.<br>५) कामगिरी, दीर्घ अंतर पार करण्याचा विक्रम डिजीटल अल्टीमिटर व जी.पी.एस. वापरुन तसेच सुरक्षिततेच्या नियम व अटीनुसार योग्य त्या हवामानामध्येच केलेली असावी.<br>६) मोहिम, विक्रम, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेतील सहभागासाठी दिल्लीच्या Aero Club of India यांची मान्यता असणे आवश्यक आहे.<br>७) राष्ट्रीय पातळीवर Aero Club of India व आंतरराष्ट्रीय पातळीवर FAI या शिखर संस्थेनी किंवा तिच्या मान्यतेने आयोजित केलेल्या स्पर्धेतील कामगिरीचे प्रमाणपत्र, निकालपत्र असले पाहिजे. किंवा त्या निकाल पत्रांच्या आधारे स्थापित झालेले राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विक्रम नोंदविले असावे.<br>८) साधन सामुग्री : पॅराग्लायडींग, पॉवर पॅराग्लायडींग (पॅरामोटार), हँग ग्लायडींग, पॉवर हँग ग्लायडींग, पॅरा जंपिंग (स्काय डायव्हींग) साठी लागणारे सर्व साहित्य हे FAI या आंतरराष्ट्रीय संस्थेने स्पर्धेमध्ये वापरण्यासाठी मान्यता दिलेले साहित्य असले पाहिजे.<br>९) पॅरा जंपिंग/स्काय डायव्हींग उडीची उंची किमान ५,००० मी. व प्रथम भारतीय ठरण्या इतपत किंवा राष्ट्रीय विक्रमाची कामगिरी असावी.<br>१०) टँडम मार्गदर्शक सुचना -<br>१. पायलटकडे एअरो क्लब ऑफ इंडियाने जारी केलेले FAI स्पोर्टींग लायसन्स असावे.<br>२. हे स्पोर्टींग लायसेन्स बरोबरच पायलटकडे किमान २०० तासांचा हवेत उड्डान अनुभवाचा लिखीत पुरावा असावा.<br>३. उड्डाण करण्यासाठी पायलट वैद्यकीयदृष्ट्या सक्षम असावा.<br>४. टँडम ऑपरेटर/पायलटने व त्यांच्या बरोबर उड्डान करणा-या व्यक्तीने हवेतील उड्डानासाठी प्रमाणित साधन सामग्रीचा वापर केलेला असणे आवश्यक आहे. |
| ५.९ | **क) जल साहसी क्रीडा प्रकार**<br>**(१) साहसी सेलींगसाठी प्रकार** - (शिडाची बोट), सेलींग अराऊंड दि वर्ल्ड सिंगल हँडेड विदाऊट एनी स्टॉप, सेलींग अराऊंड दि वर्ल्ड सिंगल हँडेड विथ स्टॉप, सेलींग अराऊंड दि वर्ल्ड विथ क्रु विदाऊट एनी |

| | |
|---|---|
| | स्टॉप, सेलींग अराऊंड दि वर्ल्ड विथ क्रु विथ स्टॉप<br>**(२) खाडी पोहणे (इंग्लिश खाडी (इंग्लंड ते फ्रान्स), कुकस्ट्रीट खाडी (न्युझिलंड), जिब्राल्टर खाडी, पाल्कस स्ट्रीट (श्रीलंका) खाडी) व समुद्र पोहणे (किमान २१ कि.मी.) पेक्षा अधिक अंतराची कामगिरी विचारात घेण्यात येईल.**<br>➢ झुरीज/इटाली/ग्रीस व अन्य आंतरराष्ट्रीय लांब पल्ल्याच्या) १०कि.मी.च्या वरील (साहसी जलतरण स्पर्धा)<br>➢ भारतीय जलतरण महासंघाद्वारे आयोजित/पुरस्कृत करण्यात येणा-या देशातील १४ कि.मी. किंवा त्यापेक्षा जास्त अंतराच्या स्पर्धा<br>➢ गुजरात राज्य शासनाच्या क्रीडा विभागामार्फत आयोजीत करण्यात येणारी अखिल भारतीय विर सावरकर सागरी जलतरण स्पर्धा<br>➢ केंद्र किंवा राज्य शासनाद्वारे आयोजित करण्यात येणा-या १० कि.मी. पेक्षा जास्त अंतराच्या सागरी साहसी जलतरण स्पर्धा<br>➢ इंग्लिश खाडी (इंग्लंड ते फ्रान्स), कुकस्ट्रीट (न्युझिलंड) खाडी पोहणे यामध्ये अतिथंड पाण्यातील पोहणे, तसेच हाय टाईड, लो टाईड, व हवेचे तापमान, थंड पाण्याचे प्रमाण, वाहत्या प्रवाहात नैसर्गिकदृष्ट्या प्रतिकूल परिस्थिती, लाटांची उंची, पोहण्याचे अंतर (कि.मी.) जागतिक मान्यता प्राप्त खाडया इ. बाबतचे पुरावे सादर करणे आवश्यक आहे.<br>➢ जल साहसी क्रीडा प्रकारात समुद्र व खाडीवरील साहसी क्रीडा प्रकार याकरीता महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड (MMB) / राज्यातील अधिकृत राज्य संघटना यांच्या जलक्रीडा धोरणातील नमूद नियम व नियमावली बंधनकारक राहील.<br>➢ जल साहसी उपक्रमास आंतरराष्ट्रीय जलतरण महासंघाद्वारे अथवा संबंधित देशातील संस्था, भारतीय जलतरण महासंघाद्वारे आयोजित किंवा मान्यता प्रदान असणे आवश्यक आहे. |
| ५.१० | ➢ राज्य संघटनांना /आयोजकांना भारतीय महासंघाची मान्यता आहे अशा संघटनांनी मान्यता अथवा प्रमाणित केलेले भारतातील साहसी उपक्रम पुरस्कारासाठी ग्राह्य समजण्यात येईल.<br>➢ केंद्र / राज्य शासनातर्फे आयोजित साहसी उपक्रम.<br>➢ अधिकृत राज्य संघटनेद्वारे किंवा मान्यता प्रदान केलेल्या अधिकृत जिल्हा संघटना/क्लबद्वारा आयोजित साहसी उपक्रम.<br>➢ अर्जदाराच्या पाच वर्षापैकी तीन वर्षातील उत्कृष्ट कामगिरी विचारात घेण्यात यावी.<br>➢ अर्जदाराच्या पुरस्कार वर्षाच्या लगतपुर्व ५ वर्षापैकी तीन वर्षातील उत्कृष्ट कामगिरी विचारात घेण्यात यावी.५ वर्षाच्या साहसी क्रीडा कामगिरीमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावरील किमान एक खाडी यशस्वीपणे पोहून पुर्ण करणे अनिवार्य आहे.<br>➢ आवश्यक तेथे संबंधित पोर्ट ट्रस्टची परवानगी घेण्यात यावी. |

परिशिष्ट – ५.१

नमुना–अ

(साहसी उपक्रमाची माहिती)

वर्ष ..................................

| अ. क्र. | उपक्रमाचे नाव | स्तर | अंतर | ठिकाण | प्रमाणीत करणारी संस्था/युनीट | कालावधी व वेळ | उपक्रम पूर्ण करण्यासाठी लागलेली वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

स्वाक्षरी -

अर्जदाराचे

नाव.......................................

******************

# शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार ( दिव्यांग खेळाडू ) नियम २०२३

| नियम क्र. ६ | शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार ( दिव्यांग खेळाडू ) |
|---|---|
| ६.१ | या नियमांना **"शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (दिव्यांग खेळाडू) नियम, २०२३"** असे संबोधण्यात यावे. |
| ६.२ | **उद्दीष्ट:** अपंग व्यक्ती (समानसंधी, हक्काचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ च्या व्याख्येनुसार अपंग व्यक्तींनी क्रीडा क्षेत्रातील विशेष उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महाराष्ट्रातील अपंग खेळाडूंचा गौरव करणे हे या पुरस्काराचे उद्दिष्ट आहे. |
| ६.३ | दरवर्षी दोन पुरुष व दोन महिला खेळाडूंना हा पुरस्कार देण्यात यावा. यामध्ये जलतरण व मैदानी खेळ या दोन क्रीडा प्रकारासाठी पुरुष व महिला असे स्वतंत्र पुरस्कार चक्राकार पध्दतीने देण्यात यावे व इतर खेळ प्रकारासाठी एक पुरुष व एक महिला स्वतंत्र पुरस्कार देण्यात यावा. |
| ६.४ | **पात्रतेचे निकष :**<br>१) नॅशनल पॅरा ऑलिम्पिक कमिटी ऑफ इंडिया व्दारा अथवा एकविध पॅराऑलिम्पिंक संघटनाद्वारा आयोजित वरिष्ठ गटातील राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत अत्युत्कृष्ट नैपुण्य दाखविणारे खेळाडू पुरस्कारासाठी पात्र राहतील.वरील दोन पैकी एकच स्पर्धा पुरस्कार वर्षामध्ये ग्राह्य धरण्यात येईल.<br>२) महाराष्ट्र पॅरा ऑलिम्पिक संघटनेव्दारा अथवा एकविध पॅरा ऑलिम्पिंक संघटनाद्वारा आयोजित वरिष्ठ गटातील राज्य अजिंक्यपद स्पर्धेत अत्युत्कृष्ट नैपुण्य दाखविणारे खेळाडू पुरस्कारासाठी पात्र राहतील. वरील दोन पैकी एकच स्पर्धा पुरस्कार वर्षामध्ये ग्राह्य धरण्यात येईल.<br>३) पुरस्कार वर्षातील ३० जून रोजी संपणाऱ्या वर्षासह लगतपूर्व पाच वर्षातील एखाद्या खेळाडूची आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय/राज्य अजिंक्यपद पातळीवरील कामगिरी विचारात घेतली जाईल. या पाच वर्षापैकी सर्वाधिक चांगल्या तीन वर्षाच्या कामगिरीचे मूल्यमापन व गुणांकन केले जाईल. सुचविलेल्या पाच वर्षापैकी किमान तीन वर्षे नॅशनल पॅरा ऑलिम्पिक असोसिएशन ऑफ इंडिया व्दारा आयोजीत अधिकृत राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत सहभाग घेतलेला असणे आवश्यक आहे.<br>४) एखादा खेळाडू एक वा दोन वर्षाच्या कामगिरीच्या आधारे पुरस्कारासाठी पात्र ठरत असेल तर त्याला वरील (३) मधील तीन वर्षे सहभागाची अट लागू होणार नाही.<br>५) आंतरराष्ट्रीय स्पर्धापैकी इंटर नॅशनल पॅरालिंपिक कमिटी कडून मान्यताप्राप्त स्पर्धांच्या प्रमाणपत्राचे गुणच फक्त ग्राह्य धरण्यात येतील.<br>६) वैयक्तिक स्पर्धा व सांघिक स्पर्धा हे भिन्न प्रकार असल्यामुळे त्यांच्याशी संबंधित खेळाडूंना शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार देण्यासाठी खालीलप्रमाणे निकष राहतील–:<br>I. अपंगाच्या खुल्या गटातील राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्ण/रौप्य/कास्य पदक विजेते खेळाडू पुरस्कारासाठी अर्ज करु शकतील.<br>II. प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करुन गुण कोष्टकाच्या आधारे सर्वोत्कृष्ट खेळाडूंची निवड करण्यात येईल.<br>III. वैयक्तिक व सांघिक खेळासाठी खाली दिलेल्या गुण कोष्टकात दर्शविलेल्या गुण पध्दतीनुसार खेळाडूस गुण देण्यात यावेत.<br>IV. या गुणकोष्टकाप्रमाणे वैयक्तिक व सांघिक स्पर्धामध्ये जे खेळाडू १६ किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त करतील ते खेळाडू पुरस्कारासाठी पात्र राहतील व गुणानुक्रमे प्रथम असलेल्या खेळाडूची पुरस्कारासाठी निवड करण्यात येईल.<br>V. दिव्यांग प्रवर्गामध्ये दोन खेळाडूंना समान सर्वाधिक गुण प्राप्त झाले असतील तर अत्युच्च कामगिरी विचारात घेण्यात येईल. तसेच दोन्ही खेळाडूंची अत्युच्च कामगिरी |

| | |
|---|---|
| | समान असल्यास वयाने ज्येष्ठ असलेल्या खेळाडूची निवड पुरस्कारासाठी करण्यात येईल.<br>(७) ज्या खेळाडूंचा जन्म महाराष्ट्रात झाला असेल किंवा सलग १५ वर्ष राज्यात रहिवासी असेल असेच खेळाडू या पुरस्कारास पात्र ठरतील.<br>८) सामान्य खेळाडू प्रमाणेच दिव्यांग खेळाडूंना ही फक्त मैदानी खेळ, जलतरण या क्रीडा प्रकारांसाठी चक्राकार पध्दतीने स्वतंत्र पुरुष आणि महिला गटाच्या खेळाकरीता पुरस्कार देण्यात यावा. उर्वरीत सर्व खेळांसाठी मिळूण गुणांक (मेरीट) प्रमाणे पुरुष आणि महिला असा प्रत्येकी दोन पुरस्कार देण्यात यावेत. |
| ६.६ | **पुरस्कारासाठी पात्र क्रीडा व खेळप्रकार :**<br>शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (दिव्यांग खेळाडू) साठी पॅरा ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धांमध्ये समाविष्ट असलेले क्रीडा प्रकार व आगामी काळात समाविष्ट होणारे क्रीडा प्रकार ग्राह्य राहतील. त्याचप्रमाणे मुक-बधीर खेळाडू व गतिमंद/मतिमंद खेळाडूंच्या बाबतीत स्पेशल ऑलिंपिक व डिफॅलिंपिक या क्रीडा स्पर्धेतील खेळप्रकार व त्यांच्या बाबी पुरस्काराकरीता ग्राह्य मानण्यात येतील. |
| ६.७ | **अर्ज करण्याची पध्दत:** -<br>१) या पुरस्काराकरिता खेळाडूंना नॅशनल पॅरा ऑलिम्पिक कमिटी ऑफ इंडिया यांचेशी संलग्न असलेल्या राज्य संघटनेव्दारे अथवा वैयक्तिकरित्या ऑनलाईन अर्ज करता येईल.<br>२) राज्य संघटनेव्दारे अर्ज सादर करताना संघटनेने त्यांच्या सचिवाने प्रमाणित केलेला संबंधित खेळाडूच्या विहित नमुन्यातील वैयक्तिक तपशिलासोबत खालीलकागदपत्रे जोडावीत :-<br>**(अ)** खेळाडूंची सलग पाच वर्षात राज्य/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय पातळीवर मिळविलेल्या क्रीडा नैपुण्य विषयक कामगिरी संबधिच्या प्रमाणपत्राच्या झेरॉक्स प्रती सादर कराव्यात व त्या सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेल्या असाव्यात. नॅशनल पॅरा ऑलिम्पिक कमिटी ऑफ इंडियाशी संलग्न असलेल्या राज्य संघटनेने प्रदान केलेल्या विजेते पदाबाबतची प्रमाणपत्रे.<br>**(ब)** खेळाडूंचे पासपोर्ट आकाराचे पाच फोटो, महाराष्ट्र राज्यातील अधिवास प्रमाणपत्र.<br>**(क)** कार्यकारी समितीने संमत केलेल्या ठरावाची प्रत.<br>**(ड)** पुरस्कार वर्षालगत पूर्व पाच वर्षामध्ये राष्ट्रीय/राज्य संघटनेने आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय/राज्यस्तरीय अधिकृत अजिंक्यपद स्पर्धांची ठिकाणे व कालावधी या बाबतची माहिती संघटनेचे सचिव व अध्यक्ष यांनी साक्षांकीत करुन **परिशिष्ट ६.२** मध्ये विहीत केलेल्या नमुन्यात **परिशिष्ट- ६.३** मधील प्रमाणपत्रासह सादर करावी.<br>३) वैयक्तिकरित्या अर्ज सादर करताना खेळाडूने विहित नमुन्यातील वैयक्तिक तपशीलासोबत पोटनियम (२) मधील (अ), (ब) व (ड) येथे नमूद केलेली कागदपत्रे स्वसाक्षांकीत करुन जोडावीत. सादर केलेले प्रमाणपत्र खोटे आहे असे आढळून आल्यास त्या खेळाडूविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.<br>४) आयुक्त स्वत:हून पुरस्कारासाठी सुयोग्य असणाऱ्या खेळाडूंच्या नावांची शिफारस पुरस्कार निवड समितीकडे करु शकतील.<br>५) अपूर्ण अर्जाचा विचार केला जाणार नाही. |

## परिशिष्ट ६.१ – मूल्यांकनासाठी गुण कोष्टक

| अ. क्र. | क्रीडा स्पर्धेचा स्तर | स्पर्धेतील खेळाडूची कामगिरी | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पहिला क्रमांक | दुसरा क्रमांक | तिसरा क्रमांक | सहभाग |
| १. | पॅरालिंपिक क्रीडा स्पर्धा | थेट पुरस्कार | थेट पुरस्कार | थेट पुरस्कार | थेट पुरस्कार |
| २. | जागतिक पॅरा क्रीडा स्पर्धा/एशियन पॅरा गेम्स/कॉमनवेल्थ पॅरा गेम्स (दर ४ वर्षांनी आयोजित होणारी स्पर्धा) | थेट पुरस्कार | थेट पुरस्कार | थेट पुरस्कार | १२ |
| ३. | आशियाई पॅरा अजिंक्यपद स्पर्धा (वरिष्ठ गट)/ कॉमनवेल्थ पॅरा अजिंक्यपद स्पर्धा (वरिष्ठ गट) ज्युनि. वर्ल्ड पॅरा अजिंक्यपद स्पर्धा. | १२ | ११ | १० | ०९ |
| ४. | वरिष्ठ पॅरा राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा. | ०९ | ०८ | ०७ | ०६ |
| ५. | वरिष्ठ पॅरा राज्य अजिंक्यपद स्पर्धा. | ०७ | ०६ | ०५ | -- |

## परिशिष्ट -६.२

| अ.क्र. | स्पर्धेचे नाव | स्पर्धेचा स्तर | ठिकाण | कालावधी | प्राविण्य |
|---|---|---|---|---|---|
| १ ते | | | | | |
| १० | | | | | |

दिनांक : स्वाक्षरी

स्थळ : सचिव / अध्यक्ष

## परिशिष्ट -६.३

(१) खेळाडूचे नांव :- कुमार/कुमारी/श्री/श्रीमती ----------------------------

(२) पत्ता :-

(३) खेळाचा प्रकार :-

| अ. क्र. | स्पर्धेचे नांव | स्पर्धेचा स्तर | ठिकाण | कालावधी | स्पर्धेतील कामगिरी प्रथम/व्दितीय/ तृतीय | स्पर्धा अधिकृत अजिंक्यपद स्पर्धा आहे /नाही, याबाबतचे स्वयंस्पष्ट अभिप्राय. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |
| ५ | | | | | | |

## परिशिष्ट -६.४

प्रमाणित करण्यात येते की, कुमार/कुमारी/श्री/श्रीमती ------------------------------------ ---------- खेळाडू नोंदणी क्रं.-------------------------------------------- हे/या ----- ------------------------------------ या खेळाचा खेळाडू असून या खेळास पॅरा ऑलिम्पिक कमिटी ऑफ इंडिया / महाराष्ट्र राज्य पॅरा ऑलिम्पिक संघटनेची मान्यता आहे. कुमार/कुमारी/श्री./श्रीमती ------------------------------------
यांनी अर्जामध्ये नमूद केलेली कामगिरी, संघटनेच्या कागदपत्रांनुसार बरोबर आहे/नाही.

कुमार/कुमारी/श्री/श्रीमती ------------------------------------ हे/या शिवछत्रपती (दिव्यांग खेळाडू) राज्य क्रीडा पुरस्कारासाठी अर्ज करण्यास पात्र आहेत/नाहीत.

स्थळ :
दिनांक:
संघटनेची मोहोर

| | |
|---|---|
| (स्वाक्षरी) | (स्वाक्षरी) |
| | सचिव |
| अध्यक्ष संघटनेचे नाव | संघटनेचे नाव |

टिप : (i) अपात्र प्रमाणित केलेल्या खेळाडू बाबतची स्वयंस्पष्ट कारणमीमांसा स्वतंत्र कागदावर संघटनेचे सचिव व अध्यक्षांच्या संयुक्त सही शिक्यानिशी देण्यात यावी.
(ii) लागू असेल तेथे ( ) अशी खूण करावी.

DNYANESHWAR ASARAJI AVHAD

Digitally signed by DNYANESHWAR ASARAJI AVHAD
DN: CN = DNYANESHWAR ASARAJI AVHAD, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT
Date: 2024.01.01 12:44:34 +05'30'

**( ज्ञानेश्वर आव्हाड )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**